दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६४ वे अंक १९७) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२४ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार, दि.०५ ऑगस्ट २०२५ (पाने ४) (किंमत २ रूपये)

## मेघना बोर्डीकरांचे वक्तव्य; ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचा निषेध

हिंगोली दि.४ (प्रतिनिधी)- राज्याच्या राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी ग्रामपंचायत अधिकाऱ्या बद्दल केलेल्या वक्तव्याचा ग्रामपंचायत अधिकारी संघटनेने सोमवारी काळ्या फिती लाऊन निषेध केला आहे. जबाबदार मंत्री अशा प्रकारचे वक्तव्य करीत असेल तर त्याचा परिणाम कामावर होणार असल्याची भिती व्यक्त करण्यात आली आहे.

परभणी येथे एका कार्यक्रमात राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी ग्रामपंचायत अधिकाऱ्याबद्दल अपमानस्पद वक्तव्य केले. त्यांच्या वक्तव्याचे राज्यभरात तिव्र पडसाद उमटत असून राज्यातील सुमारे २२ हजार ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी आज काळ्या फिती लाऊन कामकाज केले आहे. हिंगोली येथे ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष दिलीप पांढरे पाटील, सचिव राजेश किलचे, मच्छिंद्र गिरी, भुजंग भगत, गजानन राऊत, उत्तम आडे, सपना शिंदे, शुभांगी वाढोणकर, मिनाक्षी पंडीतकर यांच्यासह ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी आज काळ्या फितीलाऊन काम केले. त्यानंतर गटविकास अधिकारी विष्णू भोजे यांच्याकडे मागण्यांचे निवेदन सादर केले.

# नवीन प्रभाग रचनेनुसार आणि ओबीसी आरक्षणासह राज्यातील स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्या

### सर्वोच्च न्यायालयाचे आदेश; प्रभाग रचनेला आव्हान देणाऱ्या याचिका फेटाळल्या

नवी दिल्ली दि.४ (प्रतिनिधी)- राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांसंबंधी सर्वोच्च न्यायालयाने मोठा निर्णय दिला आहे. राज्यातील महापालिका, नगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुका या नवीन प्रभाग रचनेनुसार आणि ओबीसी आरक्षणासह घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने हिरवा कंदील दाखवला आहे. यासंबंधी नवीन प्रभाग रचनेला आव्हान देणाऱ्या याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्या. वॉर्ड किंवा प्रभाग रचना हा पूर्णपणे राज्य सरकारचा अधिकार असल्याचं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. या संबंधित दोन याचिका न्यायालयाने फेटाळल्या आहेत. त्यामुळे राज्य सरकारने आदेश दिल्यानुसार, नवीन प्रभाग रचनेनुसारच आणि २७ टक्के ओबीसी आरक्षणासह होणार हे निश्चित झाले आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या मे २०२१ पासून रखडल्या आहेत. ओबीसी आरक्षणासंबंधी एक याचिका दाखल करण्यात आली होती. त्यामुळे या निवडणुका रखडल्या होत्या. त्यावर निर्णय देत या निवडणुका ओबीसी आरक्षणानुसारच घेण्यात याव्यात असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. त्यानुसार नवीन प्रभाग रचनेचे आदेश राज्य सरकारने दिले होते.

गेल्या महिन्यात, ६ मे २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाने या संबंधित निर्देश देऊन राज्य सरकारला निवडणुका घेण्याचे आदेश दिले होते. प्रभाग रचना करण्याचा अधिकार हा पूर्णपणे राज्य सरकारचा असल्याचं त्यावेळी कोर्टाने सांगितलं होतं. त्यानुसार राज्य सरकारने नवीन प्रभाग रचनेचे आदेशही दिले होते. परंतु लातूरमधील औसा नगलालिकेसंबंधी एक हस्तक्षेप याचिका दाखल करण्यात आली. त्यामध्ये



नवीन प्रभाग रचनेवर आक्षेप घेण्यात आला होता. आता सर्वोच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली आहे.

या आधी, दोन महिन्यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला ओबीसी आरक्षणावरून काही निर्देश दिले होते. स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणुकीबाबत चार आठवड्यात नोटिफिकेशन काढा आणि चार महिन्यांच्या आत निवडणूक घ्या असं न्यायालयाने म्हटलं. १९९४ ते २०२२ पर्यंत जी ओबीसी आरक्षणाची स्थिती होती, त्यानुसारच स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक घ्या असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.

राज्य सरकारला आणि राज्य निवडणूक आयोगने दिलेल्या कार्यकाळात कार्यवाही करावी असंही न्यायालयाने म्हटलं होतं. सन २०२२ मध्ये जी प्रभागरचना झाली होती, तो कायदा रद्द करण्यात आला. तर २०१७ च्या पुनर्रचनेनुसार निवडणूक होणार आहेत.

# निशिकांत दुबे यांनी वादग्रस्त बोलू नये-मुख्यमंत्री फडणवीस



मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी मराठी - अमराठीच्या मुद्यावर वादग्रस्त विधान करणाऱ्या भाजप खासदार निशिकांत दुबे यांना आपले तोंड बंद ठेवण्याचा सल्ला दिला. महाराष्ट्रात मराठी व अमराठी माणूस सुरक्षित आहे. इथे कोणताही वाद नाही. काहीजण या प्रकरणी मुद्दाम वाद निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. पण मराठी जनता त्यांना निवडणुकीत त्यांची योग्य जागा दाखवेल. त्यामुळे दुबे यांनी या प्रकरणी कोणतीही विधाने करून नयेत, असे त्यांनी म्हटले आहे.

मुंबई महापालिकेच्या आगामी निवडणुकीत राज व उद्धव ठाकरे यांचे राजकारण पूर्णपणे संपेल असे वादग्रस्त विधान भाजप आमदार निशिकांत दुबे यांनी केला आहे. त्यांच्या या विधानाने महाराष्ट्राचे राजकारण तापले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी सोमवारी याविषयी बोलताना त्यांना असे काहीही न बोलण्याचा सल्ला दिला. ते म्हणाले, निशिकांत दुबे यांनी अशा प्रकारची वक्तव्य करू नयेत. येथील परिस्थिती हँडल करण्यासाठी आम्ही सक्षम आहोत. इथला मराठी व अमराठी माणूस सुरक्षित आहे. सगळे एकमेकांसोबत योग्यप्रकारे राहत आहेत. महाराष्ट्रात मराठी व अमराठी असा कोणताही वाद नाही. काहीजण मुद्दाम वाद निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्या लोकांना मराठी जनता व अमराठी जनता निवडणुकीत त्यांची जागा दाखवतील. त्यामुळे माझा सल्ला दुबेंना असा असेल की, या विषयात त्यांनी कोणतेही वक्तव्य करू नये.

मुंबई महापालिकेवर आमचीच सत्ता येईल असे म्हणण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. राज ठाकरेच काय, मुंबईतील छोट्यातील छोटी पार्टीही असे म्हणू शकते. आमचे रामदास आठवले साहेबही म्हणतात. आता ते आमच्यासोबत आहेत. पण ते वेगळे लढले असते तर त्यांनीही मुंबई महापालिकेवर आमचाच झेंडा लागणार असल्याचा दावा केला असता. पण आता त्यांचा झेंडा आमच्यासोबतच लागणार आहे. त्यामुळे जो पक्ष चालवतो त्याला तसे म्हणण्याचा अधिकार आहे. मुंबईत कोण सोबत येते कोण सोबत येत नाही यासंदर्भात मला काही म्हणायचे नाही. मुंबईच्या लोकांनी आपले मत बनवले आहे. मुंबई महापालिकेत महायुतीच निवडून येईल, असे फडणवीस म्हणाले.

## झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांचे निधन



नवी दिल्ली दि.४ (वृत्तसंस्था)- राज्यसभा खासदार आणि झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन (गुरुजी) यांचे आज (४ ऑगस्ट) निधन झाले. त्यांनी दिल्लीतील सर गंगाराम रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर उपचार सुरु होते. न्यूरोलॉजी, कार्डिओलॉजी आणि नेफ्रोलॉजीमधील तज्ज्ञ डॉक्टरांची एक टीम त्यांच्यावर उपचार करत होती. त्यांची प्रकृती चिंताजनक होती. त्यांना ब्रेन स्ट्रोक आला होता. त्यामुळे त्यांच्या शरीराच्या डाव्या बाजूला अर्धांगवायू झाला होता. ८१ वर्षीय गुरुजी बऱ्याच काळापासून किडनी आजाराने ग्रस्त होते. ते एक वर्षापासून डायलिसिसवर होते. त्यांना मधुमेह आणि हृदयाची बायपास शस्त्रक्रिया देखील झाली होती. शिबू सोरेन हे झारखंड मुक्ती मोर्चाचे संस्थापक आहेत. यूपीएच्या पहिल्या कार्यकाळात ते कोळसा मंत्री होते. तथापि, चिरुडीह हत्याकांडात त्यांचे नाव समोर आल्यानंतर त्यांनी केंद्रीय मंत्रिमंडळातून राजीनामा दिला. ८१ वर्षीय दिशाम गुरु शिबू सोरेन यांचा जन्म ११ जानेवारी १९४४ रोजी सध्याच्या रामगड जिल्ह्यातील गोल ब्लॉकमधील नेमरा येथे झाला.

# आम्ही दोघे भाऊ एकत्र येऊ शकतो, तर तुम्ही का भांडता?-राज ठाकरे

### मतभेद मिटवून एकत्र येण्याच्या कार्यकर्त्यांना सूचना



मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- आगामी काळातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी पक्षाचे प्रमुख नेते आणि पदाधिकाऱ्यांचा मेळावा घेतला. या वेळी त्यांनी उद्धव ठाकरे यांच्या पक्षासोबत युती बाबत अद्याप थोडी प्रतीक्षा करण्याच्या सूचना केल्या आहेत. मात्र, २० वर्षांनंतर आम्ही दोघे भाऊ एकत्र येऊ शकतो, तर तुम्ही का भांडता? असा प्रश्न उपस्थित करत त्यांनी मतभेद मिटवून एकत्र येण्याच्या सूचना सर्वांना केल्या आहेत.

या मेळाव्यात राज ठाकरे म्हणाले की, उद्धव ठाकरे यांच्या पक्षासोबत युती बाबत योग्य वेळी सांगेल. युतीचे काय करायचे? ते माझ्यावर सोड. मात्र, आपापसातील मतभेद मिटवा आणि कामाला लागा, अशा सूचना राज ठाकरे यांनी दिल्या आहेत. इतकेच नाही तर मराठीचा मुद्दा घराघरात पोहोचवा, ते करत असताना हिंदी भाषिकांचा द्वेष करु नका, अशा सूचना देखील त्यांनी पदाधिकाऱ्यांना दिल्या. कोणालाही न घाबरता आत्मविश्वासाने काम करा. नव्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या होतील, त्यांना स्वीकारा, असे आवाहन देखील राज ठाकरे यांनी केले आहे. वीस वर्षानंतर आम्ही भाऊ एकत्र येऊ शकतो, मग तुम्ही का भांडता? असा प्रश्न देखील राज ठाकरे यांनी विचारला आहे. मुंबई महानगर पालिका निवडणुकीत मनसे १०० टक्के सत्तेत येणार असल्याचा दावा देखील राज ठाकरे यांनी केला.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये सर्वात महत्वाची मानली जाणारी मुंबई महानगर पालिकेच्या निवडणुकीसाठी कामाला लागण्याच्या सूचना राज ठाकरे यांनी दिल्या आहेत. तसेच मुंबई महानगर पालिकेवरील सत्तेत मनसे देखील सहभागी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्यासाठीच मराठीचा मुद्दा घरोघरी पोहोचवण्याच्या सूचना त्यांनी पदाधिकाऱ्यांना केल्या आहेत.

## उत्तर प्रदेश दहशतवाद विरोधी पथकाकडून बदलापूरातील डॉक्टरला अटक

मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- दहशतवादी गुन्हे प्रकरणातील आरोपींना ऑनलाईन मार्गदर्शन केल्याचा ठपका ठेवत, उत्तर प्रदेश दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) बदलापुरातून एका डॉक्टरला अटक केल्याची माहिती सूत्रांनी दिली. डॉ. ओसामा म. शेख (२५) असे डॉक्टरचे नाव असून, तो बदलापूर पूर्वेतील एका रुग्णालयात निवासी डॉक्टर म्हणून कार्यरत होता. बदलापूर शहरात सोमवारी उत्तर प्रदेशमधील दहशतवादी विरोधी पथकाचे पोलीस उपअधीक्षक सुशील सिंग यांच्या नेतृत्वाखालील पथक दाखल झाले. त्यांनी स्थानिक पोलिसांच्या मदतीने बदलापूर पूर्वेतील कात्रप रस्त्यावर एका खासगी रुग्णालयात काम करणाऱ्या डॉ. ओसामा शेख याला अटक केली. परिमंडळ-४चे पोलीस उपायुक्त यांच्या मदतीने एटीएसने ही कारवाई केली.दरम्यान, डॉ. शेख याला उल्हासनगर न्यायालयात हजर केले असता त्याला ८ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे. यानंतर त्याला उत्तर प्रदेशला रवाना करण्यात आले आहे. आरोपीबाबत किंवा त्याच्या वास्तव्याबाबत अधिकची माहिती मिळू शकलेली नाही. मात्र पुरावे असल्यानेच संबंधित डॉक्टरला अटक करण्यात आल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे.

# चिमुरडीची बलात्कारानंतर हत्या करणारा आरोपी न्यायालयाच्या आवारातून फरार

ठाणे दि.४ (प्रतिनिधी)- भिवंडी न्यायालयात सुनावणीसाठी आलेला आरोपी बेसावध असलेल्या पोलिसांच्या हाती तुरी देऊन न्यायालयाच्या आवारातून पसार झाल्याची घटना घडली. सलामत अली अन्सारी असे फरार आरोपीचे नाव असून त्याला बिहारमधून अटक करण्यात आली होती. एका चिमुरडीवर बलात्कार करुन तिची हत्या करण्याचा आरोप त्याच्यावर आहे. या घटनेनंतर पोलिस यंत्रणेत खळबळ उडाली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, भिवंडी शहर पोलिस ठाणे हद्दीतील एका चाळीत राहणाऱ्या ६ वर्षीय चिमुरडीवर शारीरिक अत्याचार करण्यात आला होता. त्यानंतर त्या चिमुरडीची हत्या करून तिचा मृतदेह एका बंद असलेल्या खोलीतील बादलीत कोंबून ठेवण्यात आला होता. या प्रकरणातील आरोपी सलामत अन्सारी हा नराधम गुन्हेगार पसार झाला होता.

याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात हत्येसह पोस्को अंतर्गत दाखल गुन्ह्यात पोलिसांनी २० सप्टेंबर २०२३ रोजी मोठ्या शिताफीने सलामत अली याला बिहार येथून ताब्यात घेत अटक केली होती. त्याच्या विरोधात गुन्हा दाखल असून तो सध्या ठाणे कारागृहात बंदी होता.

सोमवारी न्यायालयीन सुनावणीसाठी सलामत अली याला ठाणे कारागृहातून भिवंडी न्यायालयात आणण्यात आले होते. यावेळी सलामत अली याने बंदोबस्तावरील पोलिस बेसावध असल्याचा फायदा घेत न्यायालयाच्या आवारातून पोबारा केला. त्यानंतर बंदोबस्तावर असलेल्या पोलिसांनी परिसरात शोध घेण्यास सुरुवात केली. पण तो आढळून आला नाही.

## राज ठाकरेंविरोधातील याचिका सुप्रीम कोर्टाने फेटाळली

मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्याविरोधात उत्तर भारतीय समुदायाविरोधात द्वेषमूलक भाषण आणि हिंसाचार भडकवल्याचा आरोप करत एक जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली असून, याचिकाकर्त्याला फटकारत मुंबई उच्च न्यायालयात जाण्याचा सल्ला दिला.

उत्तर भारतीय विकास सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सुनिल शुक्ला यांनी मुंबई उच्च न्यायालयाचे वकील घनश्याम उपाध्याय यांच्या मार्फत शुक्रवारी १८ जुलै २०२५ रोजी ही याचिका दाखल केली होती. राज ठाकरे आणि मनसे कार्यकर्त्यांविरुद्ध फौजदारी कारवाई करावी आणि निवडणूक आयोगाने मनसे पक्षाची राजकीय मान्यता रद्द करावी, अशी मागणी या याचिकेत करण्यात आली होती.

या याचिकेवर सरन्यायाधीश बी. आर. गवई आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठासमोर आज सुनावणी (पान ४ वर)

# शक्तिपीठ महामार्गाचा अट्टहास का?

### हिंगोलीतील भाटेगावच्या शेतकऱ्यांचा सरकारला सवाल

हिंगोली दि.४ (प्रतिनिधी)- शक्तिपीठ महामार्गाच्या जमीन मोजणी व अधिग्रहणाला ७० टक्के शेतकऱ्यांचा विरोध असताना जमीन अधिग्रहण कशासाठी असा संतप्त सवाल कळमनुरी तालुक्यातील भाटेगाव येथील शेतकऱ्यांनी सोमवारी महसूल प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना विचारला. त्यानंतर शेतकऱ्यांनी जमीन देण्यास विरोध असल्याचे निवेदन अधिकाऱ्यांकडे सादर केले. त्यामुळे जमीन मोजणी न करताच अधिकाऱ्यांना परतावे लागले आहे.

हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी व वसमत तालुक्यातून जाणाऱ्या शक्तिपीठ महामार्गाला शेतकऱ्यांनी सुरुवातीपासूनच विरोध केला आहे. या महामार्गामुळे शेतकऱ्यांच्या बागायती जमीन संपादीत केल्या जातील अन शेतकरी भूमिहीन होतील अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे या महामार्गाला जमीन देण्यास विरोध असल्याचे शेतकऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

दरम्यान, आज तहसीलदार जीवककुमार कांबळे यांच्यासह महसूल विभागाचे पथक तसेच भुमी अभिलेख विभागाचे कर्मचारी मोजणीसाठी गेले होते. यावेळी माजी खासदार ॲड. शिवाजी माने यांच्यासह शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

यावेळी मोजणी सुरु होण्यापुर्वीच शेतकऱ्यांनी शक्तिपीठाला जमीन देण्यास विरोध असल्याचे स्पष्ट केले. यावेळी ॲड. माने यांनी तहसीलदार कांबळे यांच्याशी संवाद साधला. सदर (पान ४ वर)

## अंजली दमानिया यांना न्यायालयाकडून वॉरंट जारी

धुळे दि.४ (प्रतिनिधी)- गेल्या काही महिन्यांपासून चर्चेत असलेल्या सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. माजी महसूल मंत्री तथा तत्कालीन भाजप नेते एकनाथराव खडसे यांच्याविरोधात सन २०१६ मध्ये निराधार आरोप केल्याप्रकरणी सामाजिक कार्यकर्त्या व आम आदमी पक्षाच्या माजी सदस्या अंजली दमानिया यांच्याविरुद्ध शिरपूर न्यायाल याने वॉरंट जारी केले आहे. या प्रकरणी धुळे जिल्ह्यातील शिरपूर येथील डॉ. मनोज महाजन यांनी अंजली दमानिया यांच्याविरोधात भारतीय दंड विधानातील कलम ४९९ (मानहानी) आणि ५०० (मानहानीसाठी शिक्षा) अंतर्गत फिर्याद दाखल केली होती. ही फिर्याद ॲड. अमित जैन व ॲड. सुधाकर पाटील यांच्या मार्फत (पान ४ वर)

# इंडिया आघाडीच्या बैठकीला उद्धव ठाकरे जाणार

मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- महाराष्ट्रात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर केल्या जाणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांकडून रणनीती आखली जात आहेत. तसेच मुंबई महापालिका समोर ठेऊन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे गटाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे यांच्यात युती होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यात आता इंडिया आघाडीची बैठक राजधानी दिल्लीत होणार असून उद्धव ठाकरे दिल्लीला जाणार असल्याची माहिती समोर आली आहे.

विधानसभा निवडणुकांचा निकाल लागल्यानंतर इंडिया आघाडीची एकही बैठक झाली नाही. आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरच होणार असल्याने आता बैठक आयोजित करण्यात आली आहे. उद्धव ठाकरे ६ ऑगस्ट रोजी सायंकाळी दिल्लीत पोहोचणार असल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या निवासस्थानी उद्धव ठाकरे यांना भोजनाचे निमंत्रण देखील असल्याची माहिती आहे. इंडिया आघाडीची बैठक ७ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आली आहे. त्यानुसार उद्धव ठाकरे हे ६ ऑगस्ट रोजी सायंकाळी दिल्लीत पोहोचणार आहेत. तसेच सध्या पावसाळी अधिवेशन सुरू असून शिवसेना ठाकरे गटाचे खासदार दिल्लीतच आहेत. शिवसेना ठाकरे गटाच्या खासदारांची बैठक घेतली जाणार आहे. इंडिया आघाडीच्या बैठकीला सर्व प्रमुख नेते उपस्थित असणार आहेत. महाराष्ट्रातून उद्धव ठाकरे, शरद पवार, सुप्रिया सुळे, संजय राऊत, आदित्य ठाकरे इंडिया आघाडीच्या बैठकीला उपस्थित असणार आहेत. त्याचसोबत इंडिया आघाडीचे इतर राज्यातील प्रमुख नेत्यांना देखील निमंत्रण देण्यात आले आहे. पावसाळी अधिवेशन असल्याने इंडिया आघाडीचे सर्वच प्रमुख नेते सध्या दिल्लीतच आहेत. त्यामुळे या बैठकीला सर्वच नेते उपस्थित असणार आहेत.

## पुण्यात दलित मुलींच्या छळाची तक्रार घेण्यास पोलिसांची टाळाटाळ

### प्रकाश आंबेडकरांचा निर्वाणीचा इशारा

पुणे दि.४ (प्रतिनिधी)- पुण्यातील कोथरुड पोलीस ठाण्यात तीन दलित मुलींचा पोलिसांकडून छळ करण्यात आल्याची धक्कादायक माहिती रविवारी समोर आली होती. तब्बल २४ तास उलटून गेल्यानंतरही पुणे पोलिसांनी याप्रकरणात गुन्हा दाखल करुन घेतलेला नाही. रविवारी रात्री रोहित पवार, सुजात आंबेडकर, अंजली आंबेडकर आणि पुण्यातील अनेक सामाजिक कार्यकर्ते यासाठी पुणे पोलीस आयुक्तालयात ठाण मांडून बसले होते. पहाटे साडेतीन वाजेपर्यंत हे सगळे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांशी चर्चा करत होते. (पान ४ वर)

# थोडक्यात बोटावर निभावलं!

'जीवावर बेतलेलं अखेर बोटावर निभावलं' म्हणून राज्याचे नूतन क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांनी गुरुवारी रात्री सुटकेचा नि:श्वास टाकला असेल. नुकत्याच पार पडलेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात सभागृहात बसले असताना कोकाटे यांनी आपल्या मोबाइलवर पत्त्यांचा डाव उघडला आणि करमणूक म्हणून 'वाईच' दोन-चार खेळ्या केल्या. त्या नेमक्या प्रेक्षक गॅलरीतून फोनच्या कॅमेऱ्याने कोणीतरी टिपल्या. त्यावरून बराच गदारोळ झाला. कोकाटेंच्या जागी दुसरा कोणी असता, तर विषय एवढा चिघळला नसता. पण, कोकाटे हे व्यक्तिमत्त्वच कोणी हलक्यात घ्यावं असं नाही. त्यामुळे, सगळ्यांनीच त्यांना गांभीर्याने घेतलं आणि कोकाटे फसत गेले. विषय खोलात जातोय याचं भान कोकाटेंना फार उशिरा आलं. केवळ या प्रकरणातच असं नाही, स्वतःच्याच मिजाशीत वावरायची सवय असलेल्या कोकाटेंबाबत हे नेहमीच होतं. अगदी युवक काँग्रेसच्या दिवसांपासून त्यांच्यासोबत राहिलेले राजकीय नेते आणि कार्यकर्ते हेच सांगतात. हे सरकार आल्यापासून कोकाटे मंत्रिमंडळात आहेत. याचं कारण यावेळच्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी आपला मतदारसंघ त्यांच्या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना देऊ केला म्हणून. पवार यांनी या निवडणुकीत पारंपरिक बारामती मतदारसंघाऐवजी ज्या मतदारसंघांचा विचार केला होता.

त्यात अहिल्यानगर जिल्ह्यातील काही मतदारसंघांबरोबरच नाशिक जिल्ह्यातील सिन्नर विधानसभा मतदारसंघाचाही समावेश होता. सिन्नरची हवा जोखण्यासाठी त्यांनी या मतदारसंघात त्यावेळी लागोपाठ दौरेही केले होते. पवार यांच्या त्या मनसुब्याचे कोकाटे यांनी स्वागतच केलं होतं. आपल्या हातातला मतदारसंघ पवार यांच्यासाठी सोडण्याची बिनशर्त तयारी दाखवल्याने साहजिकच कोकाटे यांच्या गुणांत वाढ झाली. त्यातूनच त्यांचा मंत्रिमंडळ प्रवेश नक्की झाला!

जे मनात असेल ते बोलून टाकण्यात कोकाटे मागेपुढे पाहात नाहीत. राजकारणात हा गुण बहुधा अडचणीचाच ठरतो. त्यामुळे, मंत्रिमंडळात आल्यानंतरही कोकाटे यांनी आपल्या पूर्वीच्याच लौकिकात अधिक भर टाकण्यास सुरुवात केल्यानंतर ते चांगलेच अडचणीत आले. त्यासाठी त्यांना पक्षप्रमुखांकडून खडे बोलही ऐकावे लागले. मुख्यमंत्र्यांनी उघड नाराजी व्यक्त करून झाली. पण म्हणतात ना, 'मारणाऱ्याचा हात धरता येतो, बोलणाऱ्याचं तोंड कसं धरणार?' अगदी तशीच गत कोकाटे यांच्याबाबतही झाली. 'शेतकरी भिकारी नाही. मला तसं म्हणायचं नव्हतं. माझ्या विधानाचा विपर्यास झाला' असा खुलासा करताना कोकाटे यांनी 'शेतकरी कसला भिकारी? सरकार भिकारी' असा खुलासा करून स्वतःलाच आगीतून फुफाट्यात नेऊन टाकलं'! त्याचा धुरळा खाली बसत नाही तोवर हे पत्त्यांचं प्रकरण समोर आलं. त्यातही खुलासा करताना 'बुडत्याचा पाय खोलात' अशीच गत झाली.

'मोबाइल सुरू करताना रमीचा डाव 'पॉप-अप' झाला' या त्यांच्या खुलाशानंतर विधिमंडळाने केलेल्या तपासात त्यांच्या मोबाइलवर रमीचा डाव किती वेळ चालला होता इथपासून त्यांच्या या क्रीडानंदाचे चित्रीकरण कुठून केलं गेलं? इथपर्यंत सगळ्याच बाबी उघड झाल्या. यावेळीही केवळ तेच अडचणीत आले नाहीत. त्यांच्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, प्रवक्ते, पवार - असे सगळेच अडचणीत आले. त्या सगळ्यांनीच अगदी कठोर प्रतिक्रिया दिल्या. त्यावरून 'कोकाटे यांची गच्छंती नक्की' अशा प्रकारच्या बातम्याही काही अतिउत्साही माध्यमांनी चालवल्या. पण, तसं घडणं अवघड होतं. कारण, त्याचवेळी अन्यही काही मंत्र्यांच्या तशाच वादग्रस्त बाबी सुरू होत्या. त्यांच्यावर शिस्तभंगाची किंवा औचित्यभंगाची कारवाई होण्याची चिन्ह नव्हती. जर त्यांच्यावर कारवाई नाही, तर एकट्या कोकाटेंवरच कारवाई कशी होणार? राजकारणातली गणितं आणि समीकरणं अशीच वेगळी असतात. त्यामुळे, कोकाटे वाचले. केवळ खाते बदलावर, शिक्षा म्हणून कमी महत्त्वाचं खातं स्वीकारून कोकाटेंनी स्वतःची मान सोडवून घेतली, असंच चित्र बाहेर आहे.

कोकाटे यांचं विधिमंडळाच्या सभागृहातलं गैरवर्तन केवळ रमी खेळण्याचं आहे, की सभागृहात मोबाइल वापरण्याचं आहे? सदस्यांच्या सभागृहातल्या हालचालींचं अशा प्रकारे चित्रण करणं गंभीर नाही का? या मुद्द्यांचा ऊहापोह अजूनतरी कुठे नीट झालेला दिसत नाही. विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासह विधिमंडळ प्रशासन आणि सभागृहालाही याचा विचार करावा लागेल. सभागृहाचे संकेत, परंपरांचं उल्लंघन होत असल्याच्या तक्रारी खुद्द सभागृहात सुरू असतातच.

त्यात सभागृहाच्या शिस्तीचा, सभागृहातील वर्तनाचा मुद्दाही विचारात घ्यावा लागणार आहे. सदस्यांनी; अनेकदा मंत्र्यांनीही एकमेकांना दिलेले 'तोंडात गुळणी धरण्याचे पदार्थ' वाहिन्यांच्या पडद्यावर दिसत असतात. सभागृहात असताना सदस्यांनी मोबाइलचा वापर करणं, काहीतरी चघळत राहाणं, प्रेक्षक सज्जातून प्रेक्षकांनी चित्रीकरण करणं, विविध गॅलऱ्यांत सुरू असलेल्या 'फ्री स्टाईल' हालचाली - या सगळ्या बाबी विधिमंडळाचं गांभीर्य घालवणाऱ्या आहेत. फार पूर्वी याबाबत पिठासीन अधिकारीच अत्यंत कडक आणि आग्रही असत. पिठासीन अधिकाऱ्यांच्या या पावित्र्यामुळे विधान भवनाची सुरक्षा यंत्रणाही अत्यंत सजग असे.

प्रेक्षक सज्जातील एखादा प्रेक्षक खुर्चीत पायावर पाय टाकून बसला, वार्ताहर गॅलरीतला एखादा वार्ताहर सभागृहात बोलणारा सदस्य कोण आहे, हे पाहण्यासाठी आपल्या बाकावरून वाकला, तरी सुरक्षा रक्षकाकडून त्याला जागीच ताकद दिली जात असे. गॅलरी प्रवेशिका असूनही संकेतभंग करणाऱ्यांना सुरक्षा रक्षकांनी अनेकदा गॅलऱ्यांतून बाहेर काढलेलं आहे! विधिमंडळाची प्रतिष्ठा कायम राखण्यासाठी अशा प्रकारचा आग्रह असायला हवा. तशी शिस्त लावायला हवी. ती असेल, तर कोणाचीच विधिमंडळात बसून कोणतंही आक्षेपार्ह वर्तन करण्याची हिंमत होणार नाही.

# 'जन्नत' निर्माण करणारा रफी

काही अपवाद सोडले तर रफी सर्व संगीतकारांचा लाडका होता. नौशाद पासून सी अर्जुन पर्यंत! नौशाद, ओपी नंतर आणखीन दोन महान संगीतकारांनी रफीचा सुंदर उपयोग करून घेतला. १९४७ साली दो भाई हा बर्मन दादांचा तिसरा सिनेमा होता. त्यात गीताची दोन गाणी तुफान गाजली. एक, मेरा सुंदर सपना बीत गया आणि दुसरं एक दिन हमको याद करोगे. त्या सिनेमात रफीलाही त्यांनी एक गाणं दिलं होतं. ते होत 'दूनियामे मेरे आज अंधेराही अंधेरा.'

१९४६ ते ७६ या ३० वर्षात रफी, बर्मन दादांच्या चित्रपटात ४५ सोलो आणि ४३ द्वंद्व गीतं गायला. दादांच्या ९० चित्रपटात त्यांनी रफीला जवळ जवळ चित्रपटामागे एक गाणं दिलं. त्याच दादांनी, किशोर कुमारला ५६ सोलो आणि ५६ द्वंद्व गीतं दिली. म्हणजे रफीपेक्षा जास्त. तरी बर्मनदा म्हटल्यावर फक्त किशोर आठवतो का?

नाही. रफी सुद्धा तेव्हढाच आठवतो. कारण बर्मन दादांना कुठचं गाणं कोणाला द्यावं ह्याची प्रचंड जाण होती. एक उदाहरण देतो. तीन देवीयाॅ या सिनेमामध्ये त्यांनी किशोरला तीन गाणी दिली. पण 'कही बेखयाल होकर, युही छू लिया किसीने 'ही गझल मात्र त्यांनी रफीला दिली किंवा 'ऐसे तो ना देखो' हे नशिल गाणं. कारण ही गाणी रफी जास्त चांगली गाऊ शकेल याची त्यांना खात्री होती. बर्मन दादांचा रफी हा नौशाद, ओपी किंवा शंकर जयकिशन एवढाच झपाटून टाकणारा आहे.

'तेरे मेरे सपने' घ्या किंवा 'अकेला हू मैं इस दुनिया मे' किंवा' दिन ढल जाये' किंवा 'हम बेखुदी मे तुम' हे रफी गाताना, देव आनंदच गातोय असं वाटत राहतं. तसा किशोर कुमारचा आवाज देवानंद साठी अधिक जवळचा. तरी रफीने देवानंदची गाणी अशी गायली आहेत की रेडियोवर गाणं लागलं, तरी डोळ्यासमोर देवानंद येतो. मग तुम्ही सिनेमा पाहिलेला असो किंवा नसो. रफीची ही अजब किमया आहे. रफी गाताना तो नट तुम्हाला दिसतो. म्हणूनच शंकर जयकिशन यांनी देवानंदला आवाज देताना रफीचा वापर जास्त केलाय.तलतला एखाद दुसरं, दिलंय.उदा. 'तुम तो दिलकी तार छेडकर' वगैरे. पण देवानंद साठी त्यांचा रफी हाच प्रमुख गायक आहे . मग ते गाणं 'कल की दौलत आजकी खुशीया असो किंवा धीरे धीरे चल चांद गगनमे', बर्मन दादांचा प्यासा मधला रफी तर वेगळाच होता. त्याचं कुठली गाणं पहा.

'जिन्हे नाझ है हिंद पर वो कहाॅ है' ही बदनाम वस्तीची व्यथा असो किंवा शेवटचं 'ये महलों ये तख्तो ये ताजोकी दुनिया ' साहिरचे शब्द ह्या क्रांतीच्या ठिणग्या आहेत. आणि या ठिणग्या अधिक प्रज्वलित केल्यात रफीच्या आवाजाने. रफी याने गायलेला प्रत्येक शब्द अंगावर येतो. शंकर जयकिशन याने रफीला बरसात मध्ये फक्त एकच गाणं दिलं कारण राज कपूर नेहमीच मुकेशचा आवाज घ्यायचा. बरसात मध्ये हे गाणं बॅकग्राऊंडला ठेवलं आहे. ते गाणं होतं ' मैं जिंदगीमे हरदम रोताही रहा हुॅं 'सीमा चित्रपट येईपर्यंत रफी शंकर जयकिशन कडे जास्त गायला नाही. अर्थात हलाकूमधलं रफीचं, 'आजाके इंतजारमे' कोण विसरेल? प्रेयसीची वाट पाहताना कितीवेळा म्हटलंय मी.किंवा श्री ४२० मध्ये रमया वस्तावया या गाण्यात रफीचा वापर त्यांनी करून घेतला. पण ज्या सिनेमात राजकपूर हिरो नव्हता त्या चित्रपटात शंकर जयकिशनने रफीचा आवाज भरपूर वापरला आणि शम्मी कपूर लोकप्रिय हिरो झाल्यावर शंकर जय किशन एखादा किरकोळ अपवाद वगळता फक्त



रफीला शम्मीसाठी वापरला.आणि देव आनंद प्रमाणे रफी शम्मीसाठी गाताना डोळे मिटले की डोळ्यासमोर शम्मी यायचा.

रफी- शम्मीच्या, गाण्याचे कितीतरी किस्से आहेत. तुम्ही 'किस किस किसको प्यार करू' हे गाणे ऐकले आहे?

या गाण्याचं रेकॉर्डिंग एकदा झालं होतं .पण रफीला ते पसंत पडलेल नव्हतं. त्यांने शंकरला सांगितलं 'आपण पुन्हा रेकॉर्डिंग करू. पण त्यासाठी मला सुंदर मुलींचा ताफा स्टुडिओत हवा आहे' शंकर बुचकळ्यात पडला. कारण रफी हा रंगेल वृत्तीचा कधीही नव्हता. तो पापभिरू होता.पण शंकरने निमिता प्रमोद चक्रवर्तीला,सांगितलं आणि त्यांनी सुंदर मुलींचा ताफा स्टुडिओत उभा केला.

मग रफी ने सांगितलं 'गाण्याचं रेकॉर्डिंग करताना त्यांना माझ्यासमोर उभं करा. पण त्यांनी माझ्याकडे पाहायचं नाही. हे सर्व रफीच्या मनासारखं झाल्यावर रफी गायला लागला, ' किस किस, किसको प्यार करू ,कैसे प्यार करू, ये भी है, वो भी है,' वगैरे. हे गाणे शम्मी कपूर गातोय असं त्यामुळेच वाटतं. आणखीन एक किस्सा सांगतो. गाणं आहे, 'दिल के झरोखेमे तुझको बिठाकर'

या गाण्याची चाल जय किशनने बांधली, पण पियानो स्वतः शंकरने वाजवला. या गाण्याच्या रेकॉर्डिंगच्या वेळी जयकिशनने रफिला सांगितल की दिल के झरोखे में तुझको बिठाकर हे धृपद गाताना जर तू न थांबता, श्वास न घेता गायलस तर गाणं अधिक उठून येईल. रफी ने तसं केल. रेकॉर्डिंग नंतर रफी जयकिशन ला म्हणाला 'बाबा रे असली गाणी गायला मला लावू नकोस. तू तर माझा श्वास बंद केला होतास. मी अशी दहा गाणी गायली तर अकरावं गाणं गायला मी जिवंत नसेन.' रफी याने अनेकांच्या कारकिर्दीला हातभार लावला. दिलीप कुमार, शंकर जयकिशन आणि मोहम्मद रफी नसता तर राजेंद्र कुमारने पंजाब मध्ये ट्रक चालवला असता किंवा शेती केली असती. तो गरिबांचा दिलीप कुमार झाला. आणि शंकर जय किशनचं संगीत , रफीचा आवाज या जोरावर तो ज्युबीली कुमार म्हणून मिरवायला लागला. त्याचे २५ २६ चित्रपट सिल्व्हर ज्युबीली झाले. त्याला जी मिळालेली गाणी पाहून शम्मी कपूर सुद्धा हळहळला. विशेषता' तेरी प्यारी प्यारी सुरत को' हे गाणं हसरत ने राजेंद्रकुमार याला दिलं म्हणून शम्मी कपूर हसरत जयपुरीवर तर प्रचंड चिडला होता. बहारो फुल बरसाओ असेल किंवा तुम कमसीन हो नादान हो असेल , किंवा ये मेरा प्रेमपत्र पढकर असेल, रफीने राजेंद्र कुमारच्या गळ्याला सोन्याचा गळा बनवला. मदन मोहन हा तसा पडेल चित्रपटांचा संगीतकार पण त्याची गाणी इतकी चिरंजीव की अश्वत्थामा, मारुती, कृपाचार्य या चिरंजीवांच्या यादीत मदन मोहनची गाणी बसू शकतात. सुरुवातीच्या काळात मदन मोहन याने तलतच्या आवाजाचा जास्त उपयोग केला.

उदाहरणार्थ, शबीस्थान आशियाना, मदहोश, देख कबीरा रोया, वगैरे पण नंतर रफी हाच त्याचा प्रमुख गायक झाला. आराधनानंतर किशोर कुमारचा जमाना आला.पण मदन मोहन ने रफीची साथ सोडली नाही. मग ते हिर-रांझा मधलं 'ये दुनिया ये महफिल असो 'किंवा हस्ते जखम मधलं' तुम जो मिल गये हो'. असो हिर-रांझा मध्ये राजकुमार हा रोमॅण्टीक हिरो होता. राजकुमार ह्याला रोमँटिक हिरो करणं म्हणजे कसाबला शांततेचे नोबेल प्राईज देण्यासारखं आहे. चांगल्या गाण्याची त्यामुळे पडद्यावर खांडोळी झाली आणि हस्ते जख्मचा नायक होता नवीन निश्चल. जो अभिनयात शेवटपर्यंत नवीनच राहिला आणि त्याचा चेहरा निश्चल. गंमत अशी होती की रफीचा चेहरा प्रचंड बोलका होता. तो गाताना त्याच्या चेहऱ्यावरती उत्कृष्ट आणि त्या गाण्याच्या अर्थाला न्याय देणारे भाव दिसायचे पण बऱ्याचदा त्याची गाणी गाणारे नट तसे हावभाव चेहऱ्यावर दाखवू शकत नव्हते. प्रदीप कुमार, भारत भूषण , महिपाल, वगैरे अशी मोठी यादी आहे. पण ती गाणी गाजली. रफीच्या आवाजातून तो भाव व्यक्त व्हायचा.

मदन मोहन हा गझल सम्राट ,! काही गझल त्याने तलतकडून गाऊन घेतल्या. पण काही मोहम्मद रफीने गायल्या. त्यातली मला नेहमी सर्वोत्तम वाटते ती ' गझल चित्रपटा मधली 'रंग और नूर की बारात किसे पेश करू' त्याची ती शब्द फेक, त्याची ती सुरुवात, शेवटी आवाज वर चढवत नेणं ते रफीनेच करावं.रफीचा आवाज स्वर्गातल्या देवाला ऐकू येईल असा वर चढायचा.महेंद्र कपूरचाही वर चढायचा. पण रफीच्या आवाजातला गोडवा, त्याची जाण, त्याच्या आवाजाचे चढ-उतार त्यातल्या भावनांचा आविष्कार अद्वितीय होता.

तलत, हेमंत कुमार मुकेश,मन्ना डे वगैरे च्या आवाजात एखाद खास वेगळेपण होतं. त्या प्रकारच्या वेगळ्या भावना व्यक्त करताना ते 'बाप ' वाटत. पण अष्टपैलूत्त्वावाचा विचार केला तर रफीला तोड नाही. रफीला या इतर गायकांबद्दल प्रेम होतं, आदर होता. एकदा ओपी नय्यर समोर रफीने 'पूछो ना कैसे मैने रैन बितायीचे सुर छेडले. हे गाणं तसं मन्ना डेच. ओपी त्याला म्हणाला 'अरे अख्खं गाणं गाऊन दाखव' रफीने ध्रुपद म्हटलं आणि मग रफी म्हणाला 'मन्ना डे ने जो आत्मा त्यात ओतलाय , ते ओतणं मला जमणार नाही. त्याच्या गाण्याला मी न्याय देऊ शकणार नाही. म्हणून मी इथेच थांबतो.'

आराधनानंतर किशोर चा पुनर्जन्म झाला. त्यामुळे रफी काही काळ पिछाडीवर गेला. त्याला नर्व्हस ब्रेकडाऊन सुद्धा झाला.पण किशोर बद्दल त्याला प्रचंड आदर होता. आणि किशोरला रफीबद्दल. एकदा एक इसम किशोरला भेटायला आला. त्याच्या हातात रेडिओ होता. त्यावर रफीचं गाणं सुरू होतं. ते गाणं होतं 'आज पुरानी राहो से कोई मुझे आवाज न दे ' किशोर कुमारच्या जवळ आल्यावर त्या इसमाने रेडिओ बंद केला. किशोरने त्याला सांगितलं, ' आधी रेडिओ लाव 'आणि गाणं संपल्यावर तो म्हणाला,' ये कमाल सिर्फ रफीसाब कर सकते है, उनके आगे हम सब बरसाती मेंढक है' रफी गेल्यावर त्याच्या पार्थिवाचे दर्शन घेताना किशोर कुमार चार तास रफीचे पाय चेपत रडत होता. तुम्हाला हकीकत सिनेमातलं, ' होके मजबूर, मुझे उसने बुलाया होगा' हे गाणं आठवत? हे गाणं तलत रफी, मन्ना डे, आणि भूपेंद्र गाणार होते. त्यावेळी एकाच माइक वर गाव लागे. रफी हा तलत, मन्ना डे,भूपेंद्रपेक्षा उंचीने कमी होता. त्यामुळे त्याला स्टूलावर उभ केलं होतं. गाणं रेकॉर्ड झाल्यावर भूपेंद्र म्हणाला, 'आम्ही सर्व रफी पेक्षा उंचीने मोठे आहोत पण त्याच्या आवाजाची उंची गगनभेदी आहे' रफीने आयुष्यात सर्वांना मदत केली. एकदा एक मुलगा रफीला भेटायला आला. रफी दिल्लीत होता.तो मुलगा रफीला म्हणाला 'मला फक्त गायकच नाही तर संगीत दिग्दर्शक व्हायचंय. मला मार्ग दाखवाल का? रफीने त्याला सांगितलं की तू आधी एखाद्या संगीतकाराकडे सहाय्यक म्हणून काम कर , अनुभव घे .गाण्याच्या नोटेशनचं ज्ञान घे. मी तुझ्या पाठीशी आहे. त्या मुलाचं नाव होतं रविशंकर शर्मा पुढे तो संगीतकार रवी म्हणून सुप्रसिद्ध झाला. याच रफीच्या सल्ल्यानुसार पोस्टातली नोकरी सोडून रवी हेमंत कुमारकडे सहाय्यक राहिला. त्याला देवेंद्र गोयलने वचन नावाचा सिनेमा दिला. त्यातलं पहिलं गाणं रफीने म्हटलं. ते होत, ' एक पैसा दे दे ओ जाने वाले बाबू' रवीने आपल्या बंगल्याचे नाव वचन ठेवलं. रफी वाचून रवीचे पान कधी हलत नसे. रफी गेल्यावर त्या बंगल्यात ज्या सोफ्यावर रफी तालमीसाठी बसायचा ती जागा रवीने तशीच जतन करून ठेवली. तिथे कोणालाही तो बसायला देत नसे. तिथे कोणी बसू नये म्हणून त्याने त्याची हार्मोनियम ठेवली. आणखीन काय काय सांगू?

बाबुल नावाचा एक संगीतकार एकदा रस्त्याने चालला होता रफीने त्याला पाहून गाडी थांबवली. त्याला गाडीत घेतलं. कुठे जायचं विचारलं. त्यांनी रफीला आपली करुण कहाणी सांगितली.रफी नुकताच रेकॉर्डिंग हून येत होता. त्याच्याजवळ बिदागीचं पाकीट होतं. त्याने ते उचललं आणि बाबूलच्या खिशात ठेवलं. आणि त्याला घरी सोडलं. लक्ष्मीकांत प्यारेलाल संगीतकार झाले त्यावेळी रफीने चित्रपटसृष्टीत दोन दशकं पूर्ण केली होती. पण तरीही पारसमणीसाठी रफी गायला आणि दोस्ती नंतर तर दोघांची दोस्ती घट्ट झाली.' चाहूंगा मै तुझे सांज सवेरे' या गाण्याला रफीला तिसरं फिल्मफेअर अवॉर्ड मिळाला.त्याला एकूण सहा फिल्मफेअर अवॉर्ड मिळाली. एकदा त्यांचाच 'मेरे हमदम मेरे दोस्त' मधलं 'हुई शाम उनका खयाल आ गया ' चं रेकॉर्डिंग झालं. सर्वांना रेकॉर्डिंग आवडलं . पण रफी काही काळ स्टुडिओत रेंगाळला आणि त्याने लक्ष्मीकांत प्यारेलालंना विचारलं पडद्यावर गाणं कोण म्हणणार आहे. त्यांनी सांगितलं 'धर्मेंद्र'. तो म्हणाला मला धर्मेंद्रच्या आवाजाशी जवळ जाणार्या आवाजात गाऊ दे आणि त्याने आणखीन एक टेक घेतला. त्याकाळातल्या, रोशन, चित्रगुप्त, जयदेव, खय्याम, उषा खन्नापासून रामलाल पर्यंत सर्व संगीतकारांकडे तो गायला. रामलाल ची कहाणी तर रफीचं मोठं मन दाखवणारी आहे. त्याला शांताराम बापूंनी सांगितलं की तुझी गाणी मला ऐकवं. त्याने काही ऑर्केस्ट्रा गायक जमा केले आणि त्यांच्याकडून गाणी गाऊन घेतली. बापूंनी ती ऐकली आणि त्याला सांगितलं, मला अजिबात आवडली नाहीत. शेवटी त्यांनी रफीला विनंती केली. रफी केवढा मोठा गायक! देशातल्या सर्व पुरुष गायकातला त्यावेळेला तो सर्वोत्कृष्ट होता. पण तो रामलाल साठी गायला ती गाणी रामलाल ने शांताराम यांना ऐकवली आणि त्याला सेहरा हा सिनेमा दिला.

**रफीच्या विशाल हृदयाचे किती किस्से सांगावेत?–** मोठ्या हृदयाच्या रफीचं हृदय मात्र मधुमेहामुळे नाजूक होत होत. वयाच्या ५६ वर्षी ते बंद पडलं. जन्नत असेल तर रफी नक्की तिथे असेल. पण आपल्यासाठी तो जन्नत इथे पृथ्वीवर उभारून गेला.

**– द्वारकानाथ संझगिरी**

# जनतेला उत्तम प्रशासनाचा प्रत्यय यावा यासाठी लवकरच धोरणात्मक बदल – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नागपूर, दि. ४ (प्रतिनिधी) – जनतेला उत्तम प्रशासनाचा प्रत्यय यावा यासाठी प्रशासकीय यंत्रणेत बदल व्हावे ही अनेकांची भावना होते. ती लक्षात घेऊन एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात आपण राज्य स्तरावरील सर्व जिहाधिकारी व वरिष्ठ अधिकाऱ्यांची परिषद घेऊन केलेल्या मंथनातून सहा समित्यांची स्थापना केली गेली. या समित्यांनी अत्यंत कमी कालावधीत आवश्यक त्या बदलासह अभ्यासपूर्ण शिफारसी केल्या आहेत. या शीफारनुसार तत्काळ शासन निर्णय निर्गमित करून जनतेला अभिप्रेत असलेल्या उत्तम प्रशासन प्रत्यय जनतेला मिळेल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला.

नागपूर येथील भारतीय व्यवस्थापन संस्था अर्थात आयएएम येथे दोन दिवसीय परिषदेच्या अध्यक्षीय मार्गदर्शनात ते बोलत होते. यावेळी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मुख्य सचिव राजेश कुमार, अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, अपर मुख्यसचिव (महसूल) विकास खारगे, मुख्यमंत्री यांचे सचिव श्रीकर परदेशी, सर्व विभागीय आयुक्त व मान्यवर उपस्थित होते.

प्रशासकीय यंत्रणेतील सुधारणांसाठी खाजगी संस्थांकडून अहवाल मागविण्यापेक्षा जी यंत्रणा व जे अधिकारी अहोरात्र काम करतात, जनतेसोबत असतात त्यांच्याकडून पुनर्रचना करणे अधिक महत्वाचे ठरेल असा विश्वास असल्यानेच प्रत्येक विभागीय आयुक्तांच्या अंतर्गत आपण सहा समित्या नेमल्या. यात महसूल प्रशासनातील सुधारणा, ज्या जिल्ह्यात उत्कृष्ट कार्यपद्धतीने काम झाले आहे अशा कार्यपद्धतीचे एकत्रीकरण व तसे राज्यभर नियोजन, नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी यंत्रणेत आवश्यक बदल, विविध संवर्गातील अधिकारी कर्मचारी यांच्या काम काजात सुसूत्रता, जिल्हास्तरावर असलेल्या विविध समित्यांची आवश्यकता तपासून कालबाह्य समित्या वगळणे, जिल्हा नियोजन समितीचे कार्यपद्धती याबाबत सर्व आयुक्त व त्यांच्या सदस्यांनी अत्यंत मेहनत घेऊन अभ्यासपूर्ण शिफारशी केल्या आहेत. कोणताही मोबदला न घेता हे काम समित्यांनी केले असून त्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व विभागीय आयुक्त यांचे व त्यांच्या टीमचे कौतुक केले. शासनाकडे विविध अहवालाच्या माध्यमातून अनेक शिफारसी एका येतात परंतु त्याची अंमलबजावणी कशी करावयाची हा प्रश्न कायम असतो. या समित्यांनी तो प्रश्न ठेवला नाही. शासन निर्णयाच्या प्रस्तावासह या शिफारसी असल्यामुळे याचे अधिक समाधान आहे असे त्यांनी सांगितले. जिल्हा नियोजन समितीमार्फत शासन दर वर्षी हजारो कोटी रुपये विविध योजनांवर खर्च करते. हा खर्च व यातून साध्य होणारे निष्कर्ष याचा विचार होणे आवश्यक होते. अलीकडच्या काळात जिल्हा वार्षिक योजनेकडे रोजगाराचे साधन म्हणूनही पाहिले जात होते. ही चिंतेची बाब होती. कोणतीही जिल्हा वार्षिक योजना रोजगाराचे साधन न ठरता त्याऐवजी यातून रोजगाराची मोठ्या प्रमाणात निर्मिती हावी हे अभिप्रेत आहे. यासाठी यात सुधारणा सुधारणा आवश्यक होत्या. यातून कोणत्या योजना स्वीकाराव्या व कोणत्या वगळाव्यात याची अभ्यासपूर्ण मांडणी समितीने केली. जिल्हाधिकारी यांच्याकडे या समितीचे सदस्य सचिव पद आहे त्याला कोणताच अधिकार नसावा ही बाब योग्य नव्हती. समितीने हे नेमकेपणाने हेरून जिल्हाधिकारी यांना जिल्ह्यातील विविध विकासकामान बाबत जिल्हा नियोजन समितीच्या एकूण तरतुदीपैकी पाच टक्के एवढा निधी राखीव ठेवण्याची चांगली शिफारस केली आहे असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. विकसित महाराष्ट्राचे आपण व्हिजन डोळ्यासमोर ठेवले आहे. यासाठी सुरुवातीला आपण शंभर दिवसाचा आणि नंतर दीडशे दिवसाचा कार्यक्रम निश्चित केला. यात आपण जे नियोजन केले त्या नियोजनाचे नीती आयोगाने कौतुक केले. ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीचे ध्येय आपण समोर ठेवले आहे. याला साकारण्यासाठी प्रशासनातील कोणतेही अडथळे कोणत्याही उद्योग आस्थापनांना येऊ नयेत, उद्योग व्यवसायांना चालना मिळावी, शासन स्तरावर असलेली त्यांची कामे तत्पर मार्गी लागावीत यावर भर असणे आवश्यक आहे. आपण जर आपल्या व्यावसायिकांना उत्तम सेवा दिल्या तर अमेरिकेने लादलेल्या पंचवीस टक्के कराचे आव्हान आपण लीलया पेलवू असे त्यांनी सांगितले. प्रशासनातील आजही अनेक आव्हाने मार्गी लागलेली नाहीत. सुमारे ७०००० जागा आपण पदोन्नतीने भरू शकतो यासाठी प्रशासकीय पातळीवर वरिष्ठानकडून जे मूल्यमापन व्हायला हवे ते मूल्यमापनच न झाल्याने एवढ्या पदोन्नत्या रखडलेले आहेत ही वस्तुस्थिती आपण स्वीकारली पाहिजे. याबाबत जे काही प्रलंबित अपार आहेत ते पूर्ण करण्यावर भर दिला पाहिजे. येत्या दीडशे दिवसात अनुकंपाचे एकही पद भरती वाचून राहणार नाही याची खबरदारी घेण्याची सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

**२०२९ पर्यंत महाराष्ट्र महसूल विभाग देशात ठरेल अग्रेसर – महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा विश्वास**

महसूल विभाग २०२९ पर्यंत कशा पद्धतीने प्रगतीपथावर असेल याचे व्हिजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्याला दिले असून, पुढच्या काळात आपण त्यांनी दाखविलेल्या व्हिजनवर काम




करून महसूल विभाग देशात प्रथम क्रमांकावर असेल याचा संकल्प करू, असा विश्वास महसूल मंत्री चंद्रेकर बावनकुळे यांनी आज व्यक्त केला. नागपूर येथे आज झालेल्या महसूल परिषदेत महसूल मंत्री बावनकुळे बोलत होते. मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या दोन दिवसीय परिषदेला मुख्य सचिव श्री राजेश कुमार, महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव श्री विकास खारगे, नियोजन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा, यांच्यासह राज्यातील सर्व विभागीय आयुक्त सर्व जिल्हाधिकारी उपस्थित आहेत.महसूल मंत्री बावनकुळे यांनी आज महाराष्ट्रातील महसूल विभागापुढे असलेल्या आव्हाने, विविध महसूल विषयक सुधारणा आणि पुढची दिशा याविषयी आपली भूमिका स्पष्ट केली.

पुणे येथे एप्रिल महिन्यात झालेल्या महसूल परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रातील सहा विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली महसूल विभागातील विविध विषयांचा अभ्यास करण्याची सूचना सहा समित्या स्थापन केल्या होत्या. त्या समित्यांच्या अहवालांचे सादरीकरण परिषदेच्या पहिल्या दिवशी करण्यात आले. या अहवालांतील सूचना व शिफारशी महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांनी जाणून घेतल्या. सहा महसूल आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांशी समोरासमोर संवाद करून महसूल विभागातील सुधारणा जनताभिमुख कशा होतील याविषयी चर्चा केली. महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले, सहा विभागीय आयुक्तांच्या समित्यांनी जेवढ्या शिफारसी केल्या आहेत त्याबाबतचे जीआर काढून जनतेला न्याय देण्याचा पूर्णपणे प्रयत्न सरकार करेल. अनेक कालबाह्य कायदे व जटील नियम पुढच्या काळात आपण काढून टाकू, असे सांगून महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले, जनतेला मंत्रालय गाठण्यासाठी होणारा त्रास व खर्च टाळण्यासाठी मंत्र्यांच्या अधिकाऱ्यांचे विकेंद्रीकरण करून ते अधिकारी विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपवू.

वाळू उपलब्ध होत नसल्यामुळे जनतेत काही ठिकाणी संताप आहे, हा संताप आपल्याला दिलासा बदलायचा आहे, असे सांगून ते म्हणाले, वाळू संदर्भातील अतिशय उत्तम धोरण राज्य सरकारने आणले. त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी आता सर्व महसूल अधिकाऱ्यांना आहे. जनतेला कोणत्याही स्थितीत त्रास होणार नाही याची काळजी सर्वांनी घ्यावी. विद्यार्थी, शेतकरी, शेतमजूर, कुटुंब या सर्व घटकांना न्याय मिळेल अशा योजना सरकारने आखल्या. धोरणे तयार केली. त्याची अंमलबजावणी या पुढच्या काळात कटाक्षाने केली जावी, अशी अपेक्षा आहे.

**महिन्यातील चार दिवस प्रवास करणार –** महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात तसेच तहसील कार्यालयापर्यंत महिन्यातील चार दिवस महसूलमंत्र्यांचा प्रवास निश्चित करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे विभागीय आयुक्त जिल्हाधिकारी व तहसीलदारांनी आपल्या भागात दर आठवड्याला शुक्रवारी जनतेशी संवाद साधण्यासाठी क्षेत्रीय दौरा करावा अशी अपेक्षा महसूलमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली.

**अतिरिक्त जिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी होणार आरडीसी –** प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात निवासी उपजिल्हाधिकारी हे पद आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील कामाची विभागणी लक्षात घेता अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्याकडे ही जबाबदारी देण्यात येईल असे त्यांनी सांगितले. **सनद शब्द काढणार–** अकृषक मधून सनद हा शब्द काढून टाकायचा आहे अशी शिफारस मुख्यमंत्र्यांकडे आपण करत आहोत असेही महसूल मंत्री श्री बावनकुळे म्हणाले.

**न्यायालयीन प्रकरणी कमी करणार –** अतिशय किरकोळ विषयाच्या न्यायालयीन केसेस महसूल मंत्राच्या निवाळ्यासाठी येतात ही संख्या कमी करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे असे सांगून महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले की, वर्षानुवर्षे चालणारे रस्त्याचे वाद दोन टप्प्यात संपतील यासाठी पुढाकार घेण्याची गरज असून तशी योजना महसूल विभाग आखेल.

**महसूलमंत्र्यांनी प्रोटोकॉल नाकारला!**

महसूल अधिकाऱ्यांचा विशेषत: विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांचा कामकाजाचा वेळ मंत्र्यांचे प्रोटोकॉल सांभाळण्यातच जातो. याविषयी चिंता व्यक्त करत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घोषणा केली की, यापुढे आपल्या प्रोटोकॉल सांभाळण्यासाठी विभागीय आयुक्त अथवा जिल्हाधिकाऱ्यांनी येऊ नये, या वेळेचा सदुपयोग त्यांनी जनतेच्या कामासाठी करावा असे त्यांनी सांगितले. यावेळी आकांक्षित जिल्हा व तालुका अभियानात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्हाधिकारी यांचा सत्कार करण्यात आला.

# ‘मैत्रीमध्ये कोणतीही अपेक्षा नसते, फक्त निस्वार्थ प्रेम असतं’ - रचना पहाडे जैन



छत्रपती संभाजीनगर, दि. ४ (प्रतिनिधी) - लोकांची नेहमीच अशी इच्छा असते की त्यांची मैत्री आयुष्यभर टिकावी, आयुष्यात असा क्षण कधीही येऊ नये ज्यामुळे आपली मैत्री कमजोर होईल. मैत्रीमध्ये, मित्रासाठी नेहमीच उज्ज्वल भविष्याची इच्छा असते. मैत्री म्हणजे ती खजिना जिथून माणसाला कोणत्याही प्रकारच्या चांगल्या वस्तू मिळू शकतात. खरा मित्र मित्राच्या दु: खात दु: खी असतो आणि आनंदात आनंदी असतो. खरा मित्र त्याच्या मित्राच्या दु:खामध्ये नेहमीच त्याचे दु:ख विसरतो. खरा मित्र त्याच्या मैत्रीच्या मार्गावर कोणत्याही प्रकारची जातिव्यवस्था येऊ देत नाही.

मैत्री कोणत्याही अवस्थेत असू शकते, उदा. मुलाला मुलाबरोबर रहाणे आणि मैत्री करणे आवडते, तरुण तरुणांसोबत खुश असतात तर वृद्ध माणसं आपल्या वयाच्या लोकांसोबत मैत्री करण्यास प्राधान्य देतात. थोडक्यात असे म्हटले जाऊ शकते की एक मित्र म्हणजे तो सहचर असतो ज्याला आपण आपल्या सर्व रहस्ये, त्रास आणि सुखांसाठी साथीदार बनवितो.

अनेकदा आपल्याहून भिन्न प्रवृत्ती आणि सवयी असणारे लोकं देखील आपल्या आकर्षित करता. मैत्री माणसाला एक चांगला मित्र होण्यासाठी, चांगले निष्ठावंत मित्र बनविण्यात आणि आपली मैत्री मजबूत ठेवण्यास मदत करते. मैत्रीचे महत्त्व: मैत्री करणे खूप महत्वाचे आहे.

जेव्हा जेव्हा एखादी व्यक्ती स्वत: ला दुर्सया व्यक्तीसोबत परिपूर्ण मानते, त्याच्याबरोबर असलेल्या त्रासांना स्वत: चे समजते तेव्हा त्याच्याबरोबर त्याचे दु:ख वाटू शकते. जरी रक्ताचे नाते, जातीय संबंध नसले तरीही तरीही ते भावनिकरित्या त्याशी जोडलेले आहेत, हा मैत्रीचा अर्थ आहे.

# शासनाचा महसूल सप्ताह : नागरिकांनी सतर्क राहून लाभ घ्यावा

**शासनाच्या** महसूल विभागामार्फत राज्यभर महसूल सप्ताह दि. १ ऑगस्ट ते ७ऑगस्ट या कालावधीत आरंभ झालेला आहे. महसूल विभागाच्या विविध योजनांची माहिती, लाभ व सेवा लाभार्थी स्त्री-पुरुष नागरिक, शेतकरी, कामकरी, कष्टकरी यांच्यापर्यंत प्रभावीपणे पोहचविण्यासाठी हा उपक्रम अभिनंदनिय आहे.मात्र या सेवा व योजना यांची माहिती तळागाळातील घटकापर्यंत पोहचविण्याचे कार्य ज्यांच्यावर सोपविले आहे. त्यांनी प्रामाणिकपणे आपले कर्तव्य बजवावे अशी अपेक्षा आहे.

शासकीय योजनांची माहिती गरजवंतापर्यंत योग्य प्रकारे पोहचत नाही,त्यामुळे पात्र असूनही बऱ्याच नागरिकांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळत नाही. अपुऱ्या माहितीमुळे ही बरेच लाभार्थी शासकीय योजना पासून वंचित राहतात. महसूल विभागाने प्रकर्षाने हा कार्यक्रम ग्रामीण भागात राबविणे गरजेचे आहे.गावोगावी चावडी वाचन व्हावे .ग्रामीण भागात शेतकऱ्यांचे शेतीचे खूप प्रश्न वर्षोनुवर्षे प्रलंबित राहतात व त्यामुळे कौटुंबिक वाद होऊन अनेक कुटुंबे उध्वस्त होतात. यास्तव प्रत्येक गावात किंवा सजावर तलाठी व मंडळ अधिकारी यांनी प्रत्येक शेतकऱ्यांचा शेतीचा ७/१२ हा सर्व गावकरी व शेतकरी याना बोलावून त्यांच्या समोर वाचावा,तसेच ग्रामसेवक यांनी ही प्रत्येक घराच्या मालकाना बोलावून त्यांच्या अडचणी जाणून त्या स्थळावरच दुरुस्त कराव्यात.

या महसूल सप्ताहाचा मूळ हेतू प्रशासन अधिकाधिक लोकाभिमुख करणे व त्यांना शासनाच्या विविध योजनांची माहिती देऊन त्या पात्र नागरिकांना उपलब्ध करून देणे हा आहे .या राजस्व महसूल अभियानाचे ब्रीद वाक्य सर्वांकरिता गतिमान,जबाबदार आणि सकारात्मक महसूल प्रशासन होय. तालुक्यात फिरते सेतू केंद्र हे शेतकरी, विद्यार्थी व इतरांसाठी अत्यंत उपयुक्त व कमी व कमी वेळ घेणारे असते.हे फिरते सेतू केंद्र कटाक्षाने सर्व ठिकाणी सुरू करायलाच हवे.कार्यालयातील सर्व कामकाज, नोंदवह्या, अद्यावत झाल्या तर कामकाजाची पद्धती गतिमान होईल.

महसूल कर्मचारी व अधिकाऱ्यांनी सकारात्मक दृष्टीकोनातून हा महसुल सप्ताह राबविण्याची नितांत गरज आहे. नागरिक व शेतकरी, विद्यार्थी यांनी ही अत्यंत जागरूकतेने याचा लाभ घ्यावा व इतरांनाही घेण्यास प्रवृत्त करावे.

**- धोंडीरामसिंह राजपूत**


# ‘निराधार वृद्धांना बनतोय घाटी प्रतिष्ठान आशेचा किरण’

छत्रपती संभाजीनगर, दि. ४ (प्रतिनिधी) - काळानुरूप वृद्ध होत चाललेल्या हातांना घाटी प्रतिष्ठान शिक्षण प्रसारक मंडळाने सहयोगाचा हात दिला आहे, छत्रपती संभाजीनगर येथील आधार वृद्धाश्रमातील निराधार वृद्ध माऊलींनी तयार केलेली राखी घाटी प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी संपूर्ण शहरात प्रसिद्ध करून तीनच दिवसात तब्बल दहा हजारांपेक्षा जास्त राख्या युवकांनी विकून एकत्रित १,००,०००/- रुपयांचा धनादेश आधार वृद्धाश्रमास दिला आहे. यामुळे आधार वृद्धाश्रमास घाटी प्रतिष्ठान मार्फत आधाराचा हात दिला जात आहे.

येत्या रक्षाबंधन पर्यंत संपूर्ण शहरात घाटी प्रतिष्ठानचे युवा कार्यकर्ते सदरील उपक्रम सामाजिक जाणीव म्हणून मुख्यत्वे हाती घेणार आहेत असे घाटी प्रतिष्ठानचे सहयोगी व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ.रवि पुजारी यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले.

या सामाजिक कार्यासाठी घाटी प्रतिष्ठान शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष मा.बाळकृष्णदादा साळुंके व त्यांच्या कार्यकर्त्यांच्यामार्फत सर्वतोपरी सहकार्य केले जात आहे. यासाठी विविध व्यापारी व दुकानदार यांना सोबत घेऊन नवीन आदर्श तयार करण्यात येत आहे. या सामाजिक उपक्रमासाठी युवा कार्यकर्ते नवजीवन मराठे, विश्वजीत गायकवाड, संदीप क्षीरसागर, बाबा देकले, राम पोतदार, गुंजन सलामपुरे, पुजा शर्मा, डॉ.पौर्णिमा ठाकूर, विजय नलावडे, शशांक राजे, निर्भयआबा राजे व आदी युवा कार्यकर्त्यांचा सहभाग आहे.

# धर्मतिर्थ क्षेत्रावर ४५ फुट उंचीची सिध्द भगवंताची खडगासन प्रतिमा विराजमान होणार



छत्रपती संभाजीनगर, दि. ४ (प्रतिनिधी) - प्रज्ञायोगी दिगंबर जैनाचार्य गुप्तीनंदी गुरुदेव यांच्या आर्शिवाद व प्रेरणेने धर्मतिर्थ क्षेत्राचे निर्माण कार्य प्रगतीपथावर असुन फेब्रुवारी २०२३ मध्ये ऐतिहासीक पंचकल्याणक संपन्न होवुन धर्मतिर्थ क्षेत्रावर ४५ फुट उंचीची सिध्द भगवंताची मुर्तीचे निर्माण कार्य काही दिवसातच सुरू होणार आहे. ज्या पाषाणापासुन हि मुर्ती निर्माण होणार आहे ते पाषाण सजोत पाली राजस्थान येथुन धर्मतिर्थ क्षेत्रावर येणार आहे.

२४ जुलै रोजी त्याचे प्रस्थान झाले आहे. या पाषाणाची साईज ४२ फुट बाय १२ फुटची असून २२५ टन वजनाचे हे पाषाण आहे आणि हि प्रतिमा ज्या कमळावर विराजमान होणार आहे. त्या पाषाणाची साईज १५ फुटबाय ९ फुट असून त्याचे वजन सुध्दा ४५ टन आहे. परम गुरफ भक्त इंदौर निवासी अनिलकुमारजी गोधा यांच्या वतीने या मुर्ती निर्माण करण्यासाठी विशेष सहकार्य मिळाले आहे . या पाषाणाचे ए,एस. क्लब जवळ, सोलापुर हायवे येथे ५ ऑगस्ट रोजी येण्याची शक्यता आहे. या पाषाणाचे स्वागत व पुजा करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर शहरातील राजकीय व सामाजिक कार्यकर्तेची उपस्थिती राहणार आहे. तरी सकल जैन समाजाच्या बांधवांनी पाषाणाच्या स्वागत एवं पुजनासाठी उपस्थित रहावे असे आवाहन धर्मतिर्थ विकास समितीचे अध्यक्ष चंद्रशेखर चांदमल पाटणी व महामंत्री पवनकुमार पापडीवाल यांनी केले आहे. तसेच धर्म तिर्थ विकास समितीचे वरीस्ट उपाध्यक्ष संजय पापडीवाल, राजेंद्र पाटणी, शरद जालनापुरकर, सुनिल काला, प्रकाश अजमेरा, चंद्रशेखर पाटणी नेरीवाला, धिरज पाटणी, गुलाबचंद कासलीवाल, जिंतुरकर, सतिष लोहाडे हे यासाठी परीश्रम घेत असल्याची माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली.

# सिडको वाले बडे बाबा चरणी निर्वाण लाडू अर्पण



छत्रपती संभाजीनगर, दि. ४ (प्रतिनिधी) - सिडको परिसरातील श्री कलिकुंड पार्श्वनाथ सैतवाळ दिगंबर जैन मंदिर येथे चर्या शिरोमणी मुनिश्री प्रभाव सागरजी महाराज यांचे मंगल सानिध्यात तेवीसावे तिर्थंकर भगवान पार्श्वनाथ यांचा पंचामृताने अभिषेक करण्यात आला प्रथम शांतीधारा करण्याचा सन्मान श्री दिलीपराव बाबुसा साहुजी परिवार तथा द्वितीय शांतीधारा करण्याचे सौभाग्य कुमारी जिनीषा प्रशांत भाकरे प्रकाशजी भाकरे परिवार यांना प्राप्त झाले मुनिश्री चे पाद प्रक्षालन दिलीपराव बाबुसा साहुजी परिवार शास्त्र भेट करण्याचे तथा निर्वाण लाडू अर्पण करण्याचे सौभाग्य सौ मंगला दिगंबर क्षीरसागर यांना प्राप्त झाले.

भगवान पार्श्वनाथ यांचे मोक्ष कल्याणक निमीत्ताने निर्वाण लाडू स्पर्धा घेण्यात आली यात वरिष्ठ गटात पहिला क्रमांक सौ संगीता संजयजी पाटणी द्वितीय क्रमांक सौ लता रत्नाकर अन्नदाते तृतीय क्रमांक सौ सविता प्रवीणजी गोसावी यांना मिळाला बाल गटात प्रथम क्रमांक कुमारी खुशी अनीलजी क्षीरसागर द्वितीय क्रमांक कुमारी मानसी सचीनजी बाळशेटे तृतीय क्रमांक कुमारी तनिष्का बाळशेटे यांना प्रदान करण्यात आला या विशेष कार्यक्रमात मुनिश्री नी मुकुट सप्तमी चे महत्व विषद केले.

वर्षात बारा सप्तमी येतात परंतु या सप्तमीला मुकुट सप्तमी हे विशेष नांव देण्यात आले कारण या पवित्र दिवशीच भगवान पार्श्वनाथ यांना मोक्षप्राप्ती झाली होती आजच्या दिवशी कुमारीका मुकुट सप्तमी व्रत घेऊन व उपवास करतात हे व्रत सप्त वार्षिक असतं या प्रसंगी कुमारीकांनी पुजन अष्टक केले यावेळी मुनिश्री नी आई वडील यांची आज्ञा ही मानलीच पाहिजे तसेच ब्रम्हचर्य हे विवाह होत नाही तोपर्यंत पाळलेच पाहिजे आपली नजर ही नासादृष्टी ठेवावी स्वजातीय मध्येच विवाह करील असा संकल्प करावा आपल्या संस्कृती चा धर्माचा अवमान होईल असे कृत्य न करण्याचा सल्ला ही या प्रसंगी मुनिश्री नी दिला या कार्यक्रमाला मंदिर विश्वस्त अध्यक्ष अमोल मोगले, वर्धमान वायकोस, निलेश सावळकर, प्रकाश भाकरे, राजकुमार कुरकुटे, बाहुबली धोंगडे, रविंद्र सांगोले, शेखर वायकोस यांच्यासह दिगंबर क्षीरसागर धन्यकुमार वायकोस प्रकाश दलाल विलास जोगी दिपक वायकोस बाहुबली बोपलकर प्रभाकर गोमटे अशोक वायकोस संदिप वायकोस प्रवीण गोसावी जिवनधरजी कोरडे जिनगोंडा पाटील डॉ कुलभूषण कंडारकर पारोळा चोपडा येथील गुरू भक्त सुनील वायकोस सौ सविता गोसावी सौ अर्चना मोगले सौ विनिता जोगी सौ मंगला क्षीरसागर सौ संगीता पाटणी सौ भारती भाकरे सौ मीनाताई साहूजी सौ संगीता बाळशेटे, सौ मीना आहेरकर सौ संजीवनी बाळशेटे, सौ सुनीता इंगलवार, सौ सीमा वायकोस, कुमारी श्रीया काळे, कुमारी त्रिशा मोगले, कुमारी जिनिषा भाकरे, सौ ज्योती मोगले, प्रगती महिला मंडळाच्या सर्व कार्यकर्त्यां आचार्य आर्यनंदि छात्रावास समिती व विद्यार्थी यांची लक्षणीय उपस्थिती होती प्रस्तावना अमोल मोगले व आभार विलास जोगी यांनी व्यक्त केले.

# छत्रपती शिवरायांविषयी विकृत माहिती देणाऱ्या ‘खालिद का शिवाजी’ चित्रपटावर बंदी घाला ! - हिंदु जनजागृती समितीची मागणी

मुंबई, दि. ४ (प्रतिनिधी) - ‘खालिद का शिवाजी’ या आगामी मराठी चित्रपटामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांविषयी ऐतिहासिकदृष्ट्या खोटी, तथ्यहीन व विकृत माहिती देऊन समस्त जनतेची दिशाभूल केली आहे. या विकृत प्रचारामुळे समस्त शिवप्रेमींच्या धार्मिक भावना दुखावल्या आहेत. ज्याप्रमाणे ‘‘उदयपूर फाइल्स : कन्हैय्यालाल टेलर मर्डर’’ या चित्रपटामुळे मुस्लिम समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्यामुळे त्यावर अंतरिम बंदी आणण्यात आली, त्याचप्रमाणे ‘‘खालिद का शिवाजी’’ या चित्रपटावर देखील बंदी घालण्यात यावी, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीने राज्य व केंद्र सरकारकडे केली आहे.




या चित्रपटात शिवाजी महाराजांच्या सैन्यात ३५% मुस्लिम सैनिक होते, महाराजांचे ११ अंगरक्षक मुस्लिम होते, आणि रायगडावर महाराजांनी मशिद बांधली होती, असे आक्षेपार्ह व विकृत दावे करण्यात आले आहेत. हे सर्व दावे भ्रामक, अप्रामाणिक व कोणत्याही ऐतिहासिक पुराव्याविना प्रसारित करण्यात आले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज हे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक होते. त्यांनी धर्मनिष्ठ हिंदवी स्वराज्य उभारले. त्यांनी स्वतः आपल्या सावत्र भाऊ व्यंकोजी राजेंना लिहिलेल्या पत्रात स्पष्ट उल्लेख केला आहे की, ‘तुर्क फौजेत ठेविले, मग जय कैसा होईल?’ त्यामुळे या चित्रपटात शिवाजी महाराजांना ‘सेक्युलर’ ठरवण्याचा हेतुपुरस्सर प्रयत्न इतिहासाच्या नावाने समाजात गोंधळ निर्माण करणारा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात कोणतीही जातीय जनगणना नव्हती. अशा परिस्थितीत ३५% मुस्लिम सैनिक असल्याचा दावा कोणत्या आधारावर केला जात आहे? असा सवाल समितीने उपस्थित केला आहे.

जर मुस्लिम समाजाला खरेच छत्रपती शिवाजी महाराजांविषयी प्रेम असते, तर पाच मुसलमान पातशाह्यांनी त्यांना संपवण्याचा चंग बांधला नसता किंवा छत्रपती संभाजी महाराजांना हालहाल करून मारले नसते. सध्याच्या काळातही जर मुसलमान समाजाला शिवाजी महाराजांप्रती आदर असता, तर यवत (ता. दौंड, जि. पुणे) येथे झालेल्या हिंसाचारात ‘सय्यद’ नावाच्या धर्मांध व्यक्तीने छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती फोडली नसती. त्यामुळे ‘‘खालिद का शिवाजी’’ हा चित्रपट हिंदू समाजात भ्रम निर्माण करणारा आणि शिवाजी महाराजांचे खोटे चित्रण करणारा आहे.

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १९(२) आणि भारतीय दंड संहिता कलम २९५ (अ) नुसार, ‘छत्रपती शिवाजी महाराजांचे विकृत चित्रण जनतेच्या धार्मिक भावना दुखावणारे, तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणारे ठरू शकते.’ पूर्वीही ‘पद्मावत’, ‘जोधा अकबर’ या चित्रपटांच्या वेळेस अशाच प्रकारच्या विकृत इतिहासामुळे जनक्षोभ निर्माण झाल्याची उदाहरणे आहेत.

या पार्श्वभूमीवर ‘खालिद का शिवाजी’ या चित्रपटावर जोपर्यंत त्यातील ऐतिहासिक माहितीचे अधिकृत सत्यापन होत नाही तोपर्यंत बंदी घालण्यात यावी, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीने केली आहे.

# मिटमिटा शाळेतील विद्यार्थांनी मनपा आयुक्त सोबत केला फ्रेंडशिप डे साजरा

## आम्ही सुद्धा आयुक्त होणार आणि तुमच्या सारखेच काम करणार

छत्रपती संभाजीनगर, दि. ४ (प्रतिनिधी) - मी आयुक्त होणार या नाविन्यपूर्ण उपक्रम अंतर्गत दर शनिवारी एका मनपा शाळेचे विद्यार्थी आयुक्त यांच्या जलश्री निवासस्थानी खेळण्यासाठी येतात आणि आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या सोबत संवाद साधतात. मनपा आयुक्त जी श्रीकांत यांच्या संकल्पनेतून smart school to Best School प्रकल्प अंतर्गत मी आयुक्त होणार या नाविन्यपूर्ण उपक्रम मध्ये मनपा प्रा शाळा मिटमिटा या शाळेचे विद्यार्थी या शनिवारी आयुक्तांच्या बंगल्यावर आले होते आणि त्यांना विविध खेळ खेळण्यासाठी आयुक्तांनी आपले सर्व साहित्य दिले मात्र काही विद्यार्थी म्हणाले आम्हाला हॉलीबॉल खेळायचा आहे तेथे हॉलीबॉल नव्हता म्हणून आयुक्तांनी लगेचच दोन नवीन व्हॉलीबॉल विकत आणले आणि विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी दिले मग विद्यार्थ्यांनी हॉलीबॉल,कबड्डी,खो खो, लेझीम, रस्सीखेच, क्रिकेट आणि माझ्या मामाचे पत्र हरवले असे विविध खेळ खेळल्यानंतर व खेळता खेळता शिका या संकल्पनेतून तेथे



असलेल्या निजामकालीन पाण्याच्या टाकीची माहिती घेतल्यानंतर विद्यार्थ्यांनी आयुक्त जी श्रीकांत यांच्या सोबत संवाद साधला आणि यासंवाद मध्ये आयुक्तांनी मला मिटमिटा येथे जमीन घ्यायाची आहे मिळेल का असा प्रश्न विद्यार्थ्यांना केल्यानंतर विद्यार्थी म्हणाले सर कश्यासाठी जमीन घ्याची आहे तुम्हाला तर येथे राहायला बंगला आहे तेव्हा आयुक्त म्हणाले मला तेथे माझ्या मनपा मिटमिटा शाळेसाठी मोठी आणि स्मार्ट इमारत बांधायची आहे तेव्हा विद्यार्थी म्हणाले सर ती तर आमचीच शाळा आहे आणि तुम्ही आमच्या शाळेसाठी एवढे करत आहात तर आम्ही सुद्धा सर खूप खूप अभ्यास करून आयुक्त होणार आणि तुमच्या सारखेच काम करणार आहोत.

असे विद्यार्थी म्हणाले असता सर्व विद्यार्थ्यांना आयुक्तांनी पेढे दिले व विद्यार्थ्यांनी अँडव्हान्स मध्ये आयुक्तांना फ्रेंडशिप डे च्या शुभेच्छा दिल्या. या वेळी अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील,उप आयुक्त अंकुश पांढरे, नियंत्रण अधिकारी गणेश दांडगे, शिक्षण अधिकारी भारत तीनगोटे, या उपक्रमाचे समन्वयक आणि कार्यक्रम अधिकारी ज्ञानदेव सांगळे उपस्थित होते. तसेच शाळेतील सुभाष पंडित, ज्ञानेश्वर देवरे मंगेश जाधव हे शिक्षक तर हरणे मॅडम क्रीडा प्रशिक्षक उपस्थित होत्या.

# ‘१२वी फेल’ चित्रपटातील भूमिकेसाठी विक्रांत मॅसीला सर्वोत्तम अभिनेता म्हणून राष्ट्रीय पुरस्कार

**अत्यंत** प्रतिभावान आणि समर्पित अभिनयासाठी ओळखला जाणारा विक्रांत मॅसी याला ‘१२वी फेल’ या चित्रपटातील प्रभावी भूमिकेसाठी राष्ट्रीय पुरस्कार - सर्वोत्तम अभिनेता या प्रतिष्ठित सन्मानाने गौरवण्यात आले आहे. प्रसिद्ध दिग्दर्शक विधु विनोद चोप्रा दिग्दर्शित या चित्रपटात विक्रांतने खऱ्या आयुष्यातील आयपीएस अधिकारी मनोज कुमार शर्मा यांची भूमिका साकारली आहे.

हा चित्रपट एका सामान्य कुटुंबातून आलेल्या तरुणाच्या असामान्य प्रवासाची कथा सांगतो. ज्याने कठीण परिस्थितीतही मोठं स्वप्न पाहण्याचं धाडस केलं.

दारिद्र्य, आत्मसंशय आणि भारतातील सर्वात कठीण समजल्या जाणाऱ्या यूपीएससी परीक्षेच्या दबावातून मार्ग काढत मनोजचा संघर्ष आणि आत्मविश्वास प्रेक्षकांच्या मनाला भिडतो. विक्रांत मॅसीने या भूमिकेतून आपल्या पिढीतील




सर्वोत्तम अभिनेत्यांपैकी एक असल्याचं सिद्ध केलं आहे.

मनोजच्या व्यक्तिरेखेत विक्रांतने दाखवलेली प्रामाणिकता, संवेदनशीलता आणि भावनिक खोली यांची विशेष दखल घेतली गेली आहे. त्याने साकारलेली व्यक्तिरेखा ही प्रेक्षकांना जवळची वाटते, आणि ती प्रेरणादायी देखील ठरते. समीक्षकांनी देखील विक्रांतच्या अभिनयाचं विशेष कौतुक करत त्याला अलीकडच्या काळातील सर्वोत्तम अभिनय मानलं आहे.

हा राष्ट्रीय पुरस्कार विक्रांतच्या कठोर मेहनतीचं व समर्पणाचं फलित आहे आणि त्याच्या कारकिर्दीतील एक महत्त्वाचा टप्पा ठरतो. दूरचित्रवाणीपासून चित्रपटसृष्टीपर्यंतच्या प्रवासात त्याने सातत्याने अशा भूमिका साकारल्या आहेत ज्या प्रामाणिकपणा आणि गहिरं व्यक्तिमत्त्व यांना उजाळा देतात. प्रत्येक प्रकल्पात तो आपली अभिनयक्षमता सिद्ध करतो आणि त्यामुळे तो आजच्या घडीला भारतीय चित्रपटसृष्टीतील एक अत्यंत विश्वासार्ह व आदरार्ह अभिनेता ठरला आहे. विक्रांत लवकरच आध्यात्मिक गुरु श्री श्री रविशंकर यांच्या जीवनावर आधारित आगामी बायोपिकमध्ये दिसणार आहे. आणखी एक आव्हानात्मक भूमिका जी त्याच्या अभिनयातील विविधता आणि धाडस अधोरेखित करते. राष्ट्रीय पुरस्कारआणि यादगार भूमिका यांच्या जोरावर विक्रांत मॅसी आता निश्चितच भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वाधिक मागणी असलेला आणि मान्यता प्राप्त अभिनेता बनला आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

*छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान*

# गाव विकासाच्या सामाजिक उपक्रमात गावकऱ्यांचा सहभाग आवश्यक-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी






छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- पर्यावरण रक्षण, स्वच्छता अभियान, वृक्षरोपण, रक्तदान यासारख्या गाव विकासाच्या सामाजिक उपक्रमात गावकऱ्यांचा सहभाग आवश्यक आहे,असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले.

महसूल सप्ताहानिमित्त आयोजीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत आज जिल्हाधिकारी कार्यालयात विविध प्रमाणपत्र दाखल्यांचे वाटप करण्यात आले. त्यात जात प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, रहिवास दाखला, फेरफार दाखले, शिधा पत्रिका इ.चा समावेश होता.

जिल्हाधिकारी कार्यालयात नियोजन सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकूणे, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपजिल्हाधिकारी संगिता राठोड, जिल्हा खनिकर्म अधिकारी अनिल घनसावंत, तहसिलदार शिवानंद बिडवे, अपर तहसिलदार डॉ. परेश चौधरी आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, महसूल विभाग हा आपल्या जीवनाशी निगडीत विभाग आहे. पूर्वी विविध कारणांने कामांमध्ये दिरंगाई होत असे. मात्र आता तंत्रज्ञानाचा अंगिकार झाल्याने कामांचा वेग वाढला आहे. जीवनमानात सुधारणा करतांना महसूल विभागामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत असतात. त्यात नागरिकांनी आपला सहयोग द्यावा, असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.

प्रास्ताविक निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते यांनी केले. अपर जिल्हाधिकारी अडकूणे यांनी महसूल सप्ताहात आयोजीत विविध उपक्रमांची माहिती दिली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व दाखल्यांचे वाटप करण्यात आले.

## खाणपट्टाधारकांची बुधवारी बैठक

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- कृत्रिम बाळू धोरण अंमलबजावणी करण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. या संदर्भात कार्यपद्धती व अन्य अनुषंगिक माहिती देण्यासाठी बुधवार दि.६ रोजी दु.३ वा.खाणपट्टाधारक, क्रशरधारकांची बैठक आयोजीत करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात ही बैठक होणार असून जिल्हाधिकारी दिलीप स्वामी हे या बैठकीस मार्गदर्शन करणार आहेत. उपस्थितीचे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते यांनी केले आहे.

## मंदिरे, बौद्ध विहार, गुरुद्वारे आणि जैन स्थानके गुगल वर नोंद करण्यासाठी निशुल्क ऑनलाईन गुगल मॅपिंग कार्यशाळेचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- भारत हा मंदिरांचा देश आहे जगामध्ये सर्वात अधिक मंदिरे भारतात आहेत परंतु ही सर्वच मंदिरे दुत वर शोध घेतल्यानंतर सापडत नाहीत कारण मंदिरांनी आत्तापर्यंत त्यांच्या मंदिराचे गुगल मॅपिंग केलेले नाही.

ही बाब लक्षात घेऊन विश्व हिंदू परिषदेच्या मंदिर अर्चक पुरोहित संपर्क आयामाने सर्व मंदिरे बौद्ध विहार गुरुद्वारे जैन स्थानके यांचे गुगल मॅपिंग व्हावे या दृष्टिकोनातून १६ ऑगस्ट रोजी रात्री ८ ते ९ या वेळात ऑनलाईन निशुल्क कार्यशाळेचे आयोजन केलेले असून या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी मंदिरातील अध्यक्ष सचिव यांनी त्यांचे नाव श्री.ज्ञानेश्वर जाधव ९४२२२१२७५३ या भ्रमणध्वनी क्रमांकावर नोंदवावे असे आवाहन मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे देवगिरी प्रांत संपर्कप्रमुख राजीव जहागिरदार ९४०३०८०७१२ आणि श्री विकास आपटे ९८२०३३६२१८ यांनी केले आहे

## लोकशाही दिनी ६१ अर्ज प्राप्त

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- जिल्हास्तरीय लोकशाही दिनी जिल्हाधिकारी कार्यालयात आज पार पडला. यावेळी ६१ तक्रारी अर्ज प्राप्त झाले. विभागनिहाय प्राप्त अर्ज याप्रमाणे- जिल्हा परिषद - ४, सार्वजनिक बांधकाम विभाग – ८, पाटबंधारे विभाग - १, पोलीस विभाग-२, महसुल विभाग-९, पुरवठा विभाग-१, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था-३, इतर साधे निवेदन ३३ असे एकूण ६१ अर्ज प्राप्त झाले, अशी माहिती सामान्य प्रशासन विभागातून देण्यात आली.

# नारेगाव येथील भवानी चौक ते नाला दरम्यान १७५ बांधकामे निष्कासित





छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या आदेशानुसार, पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी उपलब्ध करून दिलेल्या पोलीस अधिकारी आणि नियंत्रण अधिकारी अतिक्रमण विभाग संतोष वाहुळे यांच्या उपस्थितीत नारेगाव येथील भवानी चौक ते नाला दरम्यान केलेल्या कारवाईत एकूण १७५ एवढी पक्की आणि कच्ची बांधकामे ज्यामध्ये हॅाटेल, दुकाने, शेड,कंपाऊंड, शेड, गॅरेज, फलक, साईन बोर्ड इ. निष्कासित करण्यात आले.

सदर कारवाई मध्ये महानगरपालिकेच्या ३५० अधिकारी व कर्मचाऱ्यांचा तर पोलीस विभागाचे २०० अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश होता. या कारवाईसाठी १५ जेसीबी, ४ पोकलॅन,१५ टिप्पर, २ रूग्णवाहिका, २ कोंडवाडा वाहने,२ अग्निशमन बंब,५ इलेक्ट्रिक हायड्रॉलीक वाहने इ. वाहनांचा समावेश होता.

सदरील कारवाई मध्ये कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) अमोल कुलकर्णी, पोलीस उप आयुक्त प्रशांत स्वामी, सुदर्शन पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त धनंजय पाटील, पोलीस निरीक्षक गजानन कल्याणकर, अविनाश आघाव, सुनीता मिसाळ, कुंदन वाघमारे, हरेश्वर घुगे, मनपा सहायक आयुक्त सविता सोनवणे, अशोक गिरी,

रमेश मोरे, सय्यद समीउल्लाह,भारत बिरारे, नईम अन्सारी, अतिक्रमण समनव्य अधिकारी संजय सुरडकर व इमारत निरीक्षक कुणाल भोसले, शिवम घोडके,सागर श्रेष्ठ, तृप्ती जाधव,सय्यद जमशेद, सय्यद मजहर अली, नगररचना विभागाचे सुरज सवंडकर, शिवानंद नलगीले व नागरी मित्र पथकाचे प्रमोद जाधव सहभागी होते. आजच्या कारवाईत अडथडा निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांचा विरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे, अशी माहिती अतिक्रमण विभागामार्फत देण्यात आली आहे. उद्या भवानी चौक ते कचरा डेपो पर्यंत ३० मीटर रुंद रस्त्यावर उर्वरित माल मत्तांवरील कारवाई करण्यात येईल, अशी माहिती संतोष वाहूळे यांनी यावेळी दिली.

# राजीव गांधी महाविद्यालयात 'एक विद्यार्थी- एक वृक्ष' उपक्रम

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- राजीव गांधी महाविद्यालय करमाड ता. जि. औरंगाबाद महाविद्यालयात अण्णा भाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी चे औचित्य साधून महाविद्यालयात प्राचार्य डॉ.एस.एस. मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभाग व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र ' अभियान अंतर्गत एक विद्यार्थी -एक वृक्ष उपक्रम राबवून बहुसंख्य विद्यार्थींच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी विविध जातींचे झाडे लावण्यात आले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्य मनोज देवकर , प्रा. गणेश कुऱ्हाडे, प्रा.अर्जुन चव्हाण, डॉ.कालिदास फड, डॉ.बाळासाहेब लिहिणार, डॉ. सुखदेव पोटदुखे, डॉ. नितीन मुळे, डॉ.नरेश डहाळे, डॉ. एल.जी.दांडगे, प्रा.पठाण. प्रा. चव्हाण, प्रा.खरात,प्रा माटे, प्रा. कचरे, मधुकर राठोड, ज्ञानेश्वर जाधव, राऊत आदी. परिश्रम घेतले.



## (पान १ वरुन)

### राज ठाकरेंविरोधातील याचिका...

पार पडली. सुनावणी दरम्यान, सरन्यायाधीशांनी याचिकाकर्त्याचे वकील यांना "तुम्ही थेट सर्वोच्च न्यायालयात का आलात? मुंबई उच्च न्यायालय सुट्टीवर आहे का?" असा सवाल केला.

त्यानंतर याचिकाकर्त्याने मी याचिका मागे घेऊ शकतो का? असे विचारले. त्यानंतर कोर्टाने याचिका मागे घेण्याची परवानगी दिली आणि मुंबई हायकोर्टात जाण्याचा सल्ला दिला. "याचिकाकर्त्याचे वकील हायकोर्टात जाण्याचे स्वातंत्र्य असल्याचे सांगत ते याचिका मागे घेत आहे. आम्ही स्पष्ट करतो की आम्ही याचिकेच्या गुणवत्तेचा विचार केलेला नाही," असे कोर्टाने आदेशात म्हटले.

### शक्तिपीठ महामार्गाचा अट्टहास का?

महामार्ग भूमि अधिग्रहण कायद्याच्या चौकटीत बसत नाही. प्रकल्पाच्या बाधित शेतकऱ्यांपैकी ७० टक्के शेतकऱ्यांचा जमीन अधिग्रहणाला विरोध असेल तर जमीन अधिग्रहण करता येत नाही त्यामुळे आमच्या जमिनीमधून महामार्ग नेऊ नये असे स्पष्ट केले. इतर भागातील शेतकरी जमीन देण्यास तयार असताना आमच्या सुपीक जमिनीतून महामार्ग नेण्याचा अट्टाहास का असा सवाल त्यांनी उपस्थित केला. त्यानंतर तहसीलदार कांबळे यांच्याकडे शेतकऱ्यांनी निवेदन सादर केले.

### अंजली दमानिया यांना न्यायालयाकडून...

१२ ऑगस्ट २०१६ रोजी दाखल करण्यात आली होती.

अंजली दमानिया यांनी सन २०१६ मध्ये पत्रकार परिषदांद्वारे व विविध वृत्तवाहिन्यांना दिलेल्या मुलाखतीत आमदार एकनाथ खडसे यांच्याविरोधात कथित स्वरूपाचे आरोप केले होते. या आरोपांमुळे खडसे यांच्यासह भारतीय जनता पक्षाची प्रतिमा मलिन झाल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. या पार्श्वभूमीवर शिरपूर शहर व तालुक्यातही भाजप कार्यकर्त्यांमध्ये संतापाची लाट उसळली होती. फिर्यादी अर्जाच्या अनुषंगाने न्यायालयाने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २०२ अंतर्गत पोलीस तपासाचे आदेश दिले होते. शिरपूर पोलिसांनी या प्रकरणात भाजपा शहराध्यक्ष हेमंत पाटील, हेमराज राजपूत, रोहित शेटे, निलेश महाजन, नितीन माळी आदी साक्षीदारांचे जबाब नोंदवून तपास अहवाल न्यायालयात सादर केला.

### पुण्यात दलित मुलींच्या छळाची तक्रार...

तरीही पोलिसांनी याप्रकरणात गुन्हा नोंदवून घेण्यास नकार दिला. यानंतर वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकर हे चांगलेच संतापले. त्यांनी कदम नावाच्या पोलीस अधिकाऱ्याला फोन लावून याबद्दल जाब विचारला.

प्रकाश आंबेडकर यांनी कदम नावाच्या पोलीस अधिकाऱ्याला फोन लावला होता. मात्र, हा अधिकारी एक-दोन दिवसांत एफआयआर दाखल करुन घेऊ, असे सांगत होता. त्यावर प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले की, एक लक्षात घ्या कदम.... ती मुलगी २५ वर्षांची आहे. कुठलातरी पोलीस औरंगाबादमधून येतो आणि हे सगळ्या कोणाच्यातरी घरात घुसतात. हे पोलीस कोणत्या कायद्याखाली मुलींच्या घरात घुसतात?, असा सवाल प्रकाश आंबेडकर यांनी विचारला. पोलिसांना कोणाच्या घरात घुसण्याचा परवाना दिलेला नाही ना? त्यामुळे तुम्ही याप्रकरणात मुलींच्या तक्रारीनुसार, एफआयआर नोंदवून घ्या आणि मग त्याचा तपास करा. त्यावर पोलीस अधिकाऱ्याने दोन दिवस थांबा, अशी विनंती प्रकाश आंबेडकर यांना केली. तेव्हा प्रकाश आंबेडकर काहीसे चिडले. त्यांनी म्हटले की, दोन दिवस नाही ताबडतोब एफआयआर झाली पाहिजे. नाहीतर मी त्यांना सांगतो, धरणं देऊन बसा. कायदा हा कायदा आहे. सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले आहेत. चौकशी होत राहील, त्यामधून सत्य समोर येईल. पण एफआयआर नोंदवायला पोलिसांचा इतका विरोध का? तुम्ही एफआयआर नोंदवत नसाल तर सुप्रीम कोर्टाला पत्र पाठवू का, अशी विचारणा प्रकाश आंबेडकर यांनी केली.

# जेष्ठ नागरिकांनी स्मृतिभ्रंश आजार टाळण्यासाठी अधिक बोलके बनावे



वैजापूर दि.४ (प्रतिनिधी)- जगातील बहुतेक जेष्ठ नागरिक स्मृतिभ्रंश या विस्मरण आजाराने पछाडत आहेत. त्यांची विस्मरण शक्ती झपाट्याने वाढत आहे. हा स्मृतिभ्रंश आजार टाळण्यासाठी जेष्ठ नागरिकांनी अधिक बोलके बनावे. व हा आजार दूर ठेवावा तसेच त्यांनी अधिक कृतिशील बनून स्वतः सक्षम, सुदृढ, निकोप व निरोगी रहावे असे वक्तव्य रविवार (ता.०३) रोजी जेष्ठ विधिज्ञ राजगोपाल मालपाणी यांनी केले.येथील पीएमश्री मौलाना आझाद विद्याल यात वैजीनाथ जेष्ठ नागरिक सेवा संघाची जेष्ठ नागरिकांची सभा जेष्ठ नागरिकांच्या वाढ दिवसाच्या अभिष्टचिंतनसाठी आयोजित करण्यात आली होती.

या प्रसंगी ॲड.मालपाणी बोलत होते,ते पुढे म्हणाले की, जेष्ठ नागरिकांनी स्वतः च्या आरोग्य कडे जातीने लक्ष द्यावे,झेपेल तेव्हढे प्राणायम व योगासने करून शक्य तेव्हढे पायी फिरावे.दर सहा महिन्याला आरोग्य तपासणी करून वैद्यकीय सल्ल्याप्रमाणे स्वतः दक्ष रहावे असेही ते पुढे म्हणाले.

या प्रसंगी अध्यक्षस्थानी संघाचे प्रकाशशेठ बोथरा होते.तर जेष्ठ पिठावर,व्यापारी संघाचे जेष्ठतम अध्यक्ष काशिनाथ शेठ गायकवाड, आधार जेष्ठ नागरिक संघाचे उत्तमराव साळुंके, चैतन्य जेष्ठ नागरिक संघ चे साहेबराव साळुंके तसेच जेष्ठतम नागरिक गोपालदास आसर, श्री.एम.जी.गणोरे यांची उपस्थिती होती. आरंभी भारत मातेचे पूजन व अभिवादन करण्यात आले. ४१ जेष्ठ नागरिकांचे वाढदिवस निमित्त शाल, गुलाब पुष्प देऊन अभिष्टचिंतन करण्यात आले. या प्रसंगी रविंद्रआप्पा साखरे व सुरेश संत यांनी मनोगत व्यक्त केले तर अशोक धसे यांनी साने गुरुजी यांची प्रार्थना खरा तो एकची धर्म सादर केली.

संपतराव डोंगरे यांनी पसायदान सादर केले. सूत्र संचलन संघ सचिव धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले. आभार बाबासाहेब गायकवाड यांनी मानले. या प्रसंगी संचालक सुभाष बोहरा,बबनराव क्षीरसागर, भगवान सिंह राजपूत,मुकुंद शेठ दाभाडे, सेवा निवृत्त पोलीस अधिकारी सोपानराव निकम,नारायणी सेनेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षअशोक पवार खंडाळकर यांनी सहभाग नोंदविला. जेष्ठ नागरिक सेवानिवृत्त प्राध्यापक किसन बोरनारे, रामकृष्ण साठे, माजी प्राचार्य संपतराव साठे, अण्णासाहेब शेळके, सुदाम आप्पा गोंधळे, पी.वाय.चव्हाण श्री दिसले यांच्या सह जेष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या बचतगटांना मिनी ट्रॅक्टर; अर्ज मागविले

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या बचत गटांना ९०टक्के अनुदान मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने कल्टीव्हेटर किंवा रोटाव्हेटर व ट्रेलर यांचा पुरवठा करणे ही योजना राबविण्यात येते. या योजनेच्या लाभासाठी इच्छुक अनूसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या महीला, पुरुष बचत गटांनी सहायक आयुक्त, समाज कल्याण या कार्याल यातून अर्ज प्राप्त करुन परीपूर्ण प्रस्ताव दि.७ ऑगस्ट पर्यंत अर्ज सादर करावे असे आवाहन समाज कल्याण विभागची सहायक आयुक्त समाज कल्याण यांनी केले होते.

योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांचया स्वयंसहाय्यता बचत गटांना ९ ते १८ अश्वशक्तीचा मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने (कल्टीव्हेटर किंवा रोटाव्हेटर व ट्रेलर) खरेदी करण्यासाठी ३ लाख ५० हजार रुपये कमाल मर्यादेत ९० टक्के शासकीय अनुदान व १० टक्के स्वयंसहाय्यता बचत गटाचा हिस्सा अर्थसहाय्य केले जाते.

**योजना राबविणे मागची उदिष्टे**

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या बचत गटांना ९० ॾ अनुदानावर मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने कल्टीव्हेटर किंवा रोटाव्हेटर व ट्रेलर यांचा पुरवठा करण्याकरीता ही योजना सुरु करण्यात आली आहे.

**लाभाचे स्वरुप**

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांचया बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने खरेदी करण्याकरीता ३ लाख १५ हजार रुपयांची आर्थिक मदत.

**अटी व शर्ती**

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांचया स्वंयसहाय्यता बचत गटातील सदस्य हे महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असावेत.

स्वयंसहाय्यता बचत गटातील सर्व सदस्य (१०० ॾ) अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील असावेत.

स्वयंहाय्यता बचत गटातील अध्यक्ष, सचिव, अनुसूचित जाती प्रवर्गातील असावेत.

ट्रॅक्टर व त्याच्या उपसाधानांचया खरेदीवर रुपये ३.१५ लाख शासकीय अनुदान अनुज्ञेय राहील.

ठरवून दिलेल्या उदिष्टापेखा आर्थिक अर्ज प्राप्त झाल्यास पात्र बचत गटांची निवड लॉटरी पद्धतीने करण्यात येईल.

स्वयंसहाय्यता बचत गट नोंदणीकृत असावा.

सर्व सदस्यांचे आधार कार्ड, पॅन कार्ड, रहिवासी, उत्पन्नाचा दाखला अनिवार्य आहे.

स्वयंसहाय्यता बचत गटाचे नोदंणीकृती असावा.

सर्व सदस्यांचे आधार कार्ड, पॅनकार्ड, रहिवासी, उत्पनाचा दाखला अनिवार्य आहे.

स्वयंसहाय्यता बचत गटाचे नॅशनलाईज बँकेत, बँकखाते असने अनिवार्य आहे.

स्वयंसहाय्यता बचत गटाची सर्व सदस्यांची यादी बँककडून प्रमाणित करुन घ्यावी.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या महिला, पुरुष बचत गटांनी सहायक आयुक्त, समाजकल्याण, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात दि.७ ऑगस्ट पर्यंत कार्यालयीन वेळेत हजर राहून सर्व अटींची पूर्तता करुन प्रस्ताव सादर करावा. दि.७ ऑगस्ट नंतर कोणत्याही प्रस्तावाची त्रुटी पुर्तता करुन घेण्यात येणार नाही व तदनंतर कोणतीही तक्रार ग्राह्य धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी,असे सहायक आयुक्त समाज कल्याण यांनी कळविले आहे.

## ड्रोन उड्डाणास प्रतिबंध

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे ड्रोन, रिमोट कंट्रोल्ड मायक्रो – लाइट एअरक्राफ्ट, पॅराग्लायडर, पॅरा मोटर्स, हॅण्ड लायडर्स हॉट एअर बलून इ. उडाण क्रियांना पोलीस आयुक्ताल याच्या कार्यक्षेत्रात दि.२ ऑक्टोबरपर्यंत प्रतिबंध करण्यात येत आहे,असे पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी आदेश निर्गमित केले आहे.

## राजपूत समाजाच्या जेष्ठ सदस्या श्रीमती पुष्पाबाई विजयसिंह राजपूत यांचे दुःखद निधन



वैजापूर दि.४ (प्रतिनिधी)- येथील राजपूत समाजाच्या जेष्ठ सदस्या श्रीमती पुष्पा बाई विजयसिंह राजपूत यांचे सोमवार (ता.०४) रोजी सकाळी साडे सहा वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांचे वय ७१ वर्ष होते. त्यांच्या पार्थिवावर सोमवार रोजीच सायंकाळी चार वाजता येथील अमर धाम मध्ये अंतिम संस्कार करण्यात आले.त्यांच्या मागे दोन विवाहित मुले व दोन विवाहित मुली, सुना, जावाई नातवंडे असा परिवार आहे. त्यांना राजपूत समाजाचे जेष्ठ सदस्य भगवानसिंह राजपूत, माजी नगरसेवक दिलीपसिंह राजपूत, सुरेश संत, जेष्ठ नागरिक धोंडीरामसिंह राजपूत,विजयसिंह फौजी, जयपालसिंह राजपूत, ॲड.धरमसिंह राजपूत यांनी श्रद्धांजली अर्पण केली. येथील चालक संघटनेचे अध्यक्ष दुर्गादास राजपूत यांच्या त्या मातोश्री तर मल कापूर जि.बुलढाणा चे रहिवाशी बजरंग राजपूत यांच्या त्या भगिनी होत.

**महावीर शिक्षण प्रसारक मंडळ जायकवाडी ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर संचलित**

**ओंकार मुकबधीर निवासी विद्यालय पैठण व अपंग निवासी विद्यालय जायकवाडी ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर**

**शासन मान्य अनुदानीत**

**पाहिजेत**

| अ.क्र. | पदनाम | जागा | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| १. | कला शिक्षक | ०१ | एटीडी / सीटीसी |
| २. | सफाईगार | ०१ | ४ थी पास |

अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त शासन मान्य अनुदानित शाळेवर दिनांक ३१/०७/०२५ रोजी रिक्त झालेल्या पदावर वरील जागा भरणे आहेत. मुलाखतीस स्वखर्चाने मुळ कागदपत्रासह दिनांक १०/०८/०२५ रोजी सकाळी १०.०० ते संध्याकाळी ४.०० वाजेपर्यंत अपंग निवासी विद्यालय जायकवाडी ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर येथे मुलाखतीस हजर राहावे.

**स्वाक्षरीत**
**अध्यक्ष**

**स्वाक्षरीत**
**सचिव**